cmyk

## संपादकीय

### जागावाटपात भाजपची शिंदे गटावर दांडगाई

महाराष्ट्रात जागावाटपाची रणधुमाळी अजून संपलेली नाही. एका-एका जागेसाठी महायुतीत चर्चेच्या फैऱ्या झडत आहेत. महायुतीत बऱ्याच जागांवर खल सुरू आहे. खरी रस्सीखेच भाजप आणि शिवसेना शिंदे गटात सुरू आहे. आतापर्यंत बऱ्याच जागांचा तिढा संपलेला आहे, असे सांगण्यात येत असले तरी काही मोजक्या जागांवर अजूनही हमरीतुमरी सुरू आहे. कल्याणची जागा शिंदे गटाला सोडण्यात आली आहे मात्र, ठाण्यावर भाजपचा दावा कायम आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com






बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१ | गुरूवार दि.११ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | ■ पाने- ६ | किंमत ३ रूपये


# शेतकरी जगाचा पोशिंदा, मग त्याच्याच पदरी उपेक्षेचं जगणं का?

## देवदूत डॉ.ओमप्रकाश शेटे यांचा जळजळीत सवाल

बीड । प्रतिनिधी

**शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. काळ्या मातीत घामाचे शिंपण करून त्यातून मोती पिकवण्याची किमया त्याच्या अंगी आहे. त्याने पिकवलेल्या धान्यातून जगाची भूक लागते म्हणून तू जगाचा पोशिंदा म्हणून संबोधला जातो. मात्र वर्षानुवर्ष त्याच्याच नशिबी उपेक्षेचं जगणं का? असा जळजळीत सवाल उपस्थित करून बळीराजाचं जगणं सुकर करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्याची गरज असल्याचे प्रतिपादन आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी केले. दैनिक राज्य लोकतंत्र च्या द्वितीय वर्धापन दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात शेटे बोलत होते.**

बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात दैनिक राज्य लोकतंत्रच्या द्वितीय वर्धापन दिनाच्या निमित्ताने जिल्ह्यातील ११ कर्तृत्ववान शेतकऱ्यांचा गुणगौरव आणि आपल्या संकल्पनेतून गावाचा कायापालट करणाऱ्या ११ आदर्श सरपंच यांचा पुरस्कार देऊन अभूतपूर्व सन्मान करण्यात आला. आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या शुभहस्ते




सरपंच व शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर सामाजिक कार्यकर्ते गौतम खटोड, इन्फंट इंडियाचे संचालक दत्तामामा बारगजे, पसायदान सेवा प्रकल्पचे संचालक गोवर्धन दराडे, परमेश्वर येवले, देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडू जी खांडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संपादक अशोक खाडे यांनी केले. तर निवासी संपादक गणेश मोकाशे यांनी आपल्या दैनिकाची शेतकरी व समाजाप्रती असलेली भूमिका विशद केली. गौतमजी खटोड, दत्ताजी बारगजे, गोवर्धन दराडे यांनी आपल्या भाषणातून दैनिक राज्य लोकतंत्र व शेतकरी बांधवांबाबत कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी पुढे बोलताना डॉ.ओमप्रकाश शेटे म्हणाले की, शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी केंद्र व राज्य सरकार शिवकालीन पाणी साठवण योजना, राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजना आदी योजना राबवत आहे. मात्र याची खरी प्रेरणा ◀◀ पान २ वर

### यांचा झाला सन्मान

यावेळी आदर्श शेतकरी गोकुळ नखाते, रा. आवरगाव, ता. धारूर, भागवत मोरे, रा. कारी, ता. धारूर, बप्पासाहेब डावकर, रा. मौज, ता. बीड, प्रल्हाद गवारे, रा. चिंचवडगाव, ता. वडवणी, भागवत ठोंबरे, रा. दिंद्रुड, ता. माजलगाव, अड शरद किशनराव नाईकनवरे, रा. माजलगाव , शहाजीराव भोसले, रा. सांगवी, ता. आष्टी, बाजीराव जाधव, रा. वरंगलवाडी, ता. शिरूर, पंडितराव लांडे, रा. घाटसावळी, ता. बीड, आदिनाथ गवारे, रा. काडीवडगाव ( चिंचवडगाव), अमोल लंबे, रा. सिरसमार्ग, ता. गेवराई, यांचा तर आदर्श सरपंचांमध्ये अशोक सोळंके, बोरगाव, ता. माजलगाव, भगवान कांदे, संगम, ता. धारूर, अशोक चोले, खडकी, ता. वडवणी, भागवत दराडे, जैतापूर, ता. धारू, मयूर आंधळे, रुई पिंपळा, ता. वडवणी, पुष्पाताई खकाळ, शेरी, खकाळवाडी, ता. आष्टी, सौ. सागर शहादेव खेडकर, सावरगाव चकला, ता. शिरूर, सौ. संगीता भास्कर सानप, फुलसांगवी, ता. शिरूर, सौ, प्रीती अमोल बागलाने, काकडहिरा, ता. , बीड, अजय घोडके, लोळदगाव, ता. बीड, सौ. त्रिवेणी दशरथराव उगले, ममदापुर पाटोदा, ता. आंबाजोगाई यांचा मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला.

### सातारा साज आर्केस्ट्राने जिंकली बीडकरांची मने

दैनिक लोकतंत्र च्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त पुरस्कार वितरण सोहळ्यासोबतच सातारा येथील प्रसिद्ध गायक रवींद्र केंजळे प्रस्तुत साज या आर्केस्ट्राने बीड करांची मने जिंकली. लावणीसह नव्या जुन्या गाण्यांचा संगम साधून बहारदार गीते गायल्याने उपस्थितांनी टाळ्या वाजवून त्यांचे स्वागत केले.

### डोळ्यात टचकन पाणी आले...

डॉ. ओमप्रकाश शेटे बोलत असताना त्यांनी सांगितले की, ''एका शेतकऱ्याचा सत्कार करत असताना माझी नजर त्याच्या पायाकडे गेली. त्यांच्या पायातील फाटकी चप्पल पाहून मनाला प्रचंड वेदना झाल्या. हेच काय शेतकऱ्यांचे जीवन? आयुष्यभर काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांची अशी दयनीय अवस्था असेल तर....! खरंच, सर्वांनी अंतर्मुख होऊन विचार करण्यासारखी गोष्ट आहे.'' हे वाक्य बोलत असताना शेटे यांच्या डोळ्यातून टचकन अश्रू आले. साहजिकच उपस्थितांच्याही डोळ्याच्या कडा पालवल्या .

# राहुल गांधी १३ एप्रिलला महाराष्ट्रात

नवी दिल्ली । वृतसंस्था

**लोकसभा निवडणूक प्रचारासाठी काँग्रेस नेते राहुल गांधी १३ एप्रिलला महाराष्ट्रातील भंडारा दौऱ्यावर आहेत. यानिमित्ताने राहुल गांधी पहिल्यांदा भंडारा दौऱ्यावर असणार आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा मतदारसंघ असलेल्या साकोलीत काँग्रेस उमेदवारांसाठी ते प्रचार सभा घेणार आहेत. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासह पक्षाचे प्रमुख नेते आणि पहिल्या टप्प्यातील काँग्रेसचे पाचही उमेदवार उपस्थित राहणार आहेत.**



आगामी लोकसभा निवडणुकीत पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रात पाच लोकसभा मतदारसंघांमध्ये निवडणुका होत आहेत. हे पाचही मतदारसंघ विदर्भातील आहेत आणि महाविकास आघाडीद्वारे सर्व पाचही मतदारसंघांमध्ये काँग्रेसचेच उमेदवार आहेत. पहिल्या टप्प्यात विविध पक्षांचे प्रमुख ◀◀ पान २ वर

# धनंजय मुंडे व पंकजा मुंडे यांची दिलीप धुत यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

## » लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर झाली चर्चा

बीड । प्रतिनिधी

**राज्याचे कृषीमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजयजी मुंडे साहेब व महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार, भा.ज.पा. च्या राष्ट्रीय सचिव मा.पंकजाताई मुंडे यांनी राजयोग फाऊंडेशन चे संस्थापक दिलीप धुत, नगरसेवक शुभम धुत यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी मा. पंकजाताई व ना.धनुभाऊंचे धुत परिवाराच्या वतिने स्वागत करुन मा. पंकजाताईंना**



**विजयासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. त्यांचा सत्कार करताना पर्यटन विकास महामंडळाचे माजी संचालक दिलीप धुत, माजी नगराध्यक्षा सौ.स्मिता धुत, नगरसेवक शुभम धुत, राजदीप धुत व इतर उपस्थित होते.**

यानिमित्ताने आगामी लोकसभा निवडणुकीसह, लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब व धुत परिवाराच्या १९९५ पासूनच्या ऋणानुबंधावर यावेळी चर्चा झाली. यावेळी राष्ट्रवादी ◀◀ पान २ वर

# दै.राज्य लोकतंत्र वर शुभेच्छांचा वर्षाव...!

## मान्यवरांसह सर्वसामान्य वाचकांच्या उपस्थितीत दुसरा वर्धापणदिन उत्साहात साजरा

















बीड । प्रतिनिधी

**बीड वृत्तपत्र क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण करीत वेगाने घौडदौड करणाऱ्या दै.राज्य लोकतंत्र चा दुसरा वर्धापण दिन गुढीपाडव्याच्या शुभ दिवशी दि.९ एप्रिल रोजी उत्साहात पार पडला. यावेळी मान्यवरांसह सर्वसामान्य वाचकांनी बीड येथीला जालना रोडवरील हॉटेल यशराज इन येथे आयोजित केलेल्या चहापान कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून शुभेच्छांचा वर्षाव केला.**

दोन वर्षांपुर्वी गुढीपाडव्याच्या शुभ मुहुर्तावर नवी दिशा नवे विचार घेवून दै.राज्य लोकतंत्र ची सुरूवात झाली. सकारात्मक बातमीला प्राधान्य देत पत्रकारितेतील बाज आणि बूज राखून दै.राज्य लोकतंत्र ने दोन वर्षात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. लोकतंत्र ने शेती आणि शेतकरी या विषयाला सर्वाधिक प्राधान्य देत वाचकांची रूची सांभाळली असून, दैनिकाची ही भूमिका वाचकांच्या पसंतीस उतरली आहे. याचीच प्रचिती वर्धापण दिनानिमित्त आयोजित केलेल्या चहापान कार्यक्रमा दरम्यान आली. वाचक आणि हितचिंतकांनी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवीत दै.राज्य लोकतंत्र चे निवासी संपादक गणेश मोकाशे, कार्यकारी संपादक अशोक खाडे, उप संपादक अनिल जाधव, उप संपादक विशाल सोळंके, वितरण प्रतिनिधी दिलीप शिंगाडे, नागेश क्षीरसागर, अमोल शिंदे, आणि लोकतंत्र टिमचे अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या.

यावेळी पालकमंत्री धनंजय मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बजरंग सोनवणे, वंचित चे नेते अशोक हिंगे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री अशोक पाटील, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख, संपादक सर्वोत्तम गावरस्कर, संपादक राजेंद्र आगवान, संपादक गंमत भंडारी, संपादक अजित वरपे, ज्येष्ठ पत्रकार जगदीश पिंगळे, संपादक विजयराज बंब, संपादक शेख तय्यब, संपादक शेख मुजिब, पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकुर, पो.नि.बल्लाळ, राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडी (शरद पवार गट) नेत्या ॲड.हेमाताई पिंपळे, कार्यकारी संपादक सुभाष चौरे, संपादक विलास डोळसे, शेतीनिष्ठ शेतकरी कल्याण कुलकर्णी, माजी आ.उषाताई दराडे, अनिल अष्टपुत्रे, वृत्तपत्र वितरक सुदाम चव्हाण, सुमुर्ती वाघीरे, युवा नेते सचिन दुधाळ, उद्योजक संजय शिंदे, ॲड.राजेंद्र नवले, कार्यकारी संपादक डॉ.बाळासाहेब पिंगळे, उद्योजक शुभम धूत, वृत्तसंपादक ◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# जागावाटपात भाजपची शिंदे गटावर दांडगाई

महाराष्ट्रात जागावाटपाची रणधुमाळी अजून संपलेली नाही. एका-एका जागेसाठी महायुतीत चर्चेच्या फैऱ्या झडत आहेत. महायुतीत बऱ्याच जागांवर खल सुरू आहे. खरी रस्सीखेच भाजप आणि शिवसेना शिंदे गटात सुरू आहे. आतापर्यंत बऱ्याच जागांचा तिढा संपलेला आहे, असे सांगण्यात येत असले तरी काही मोजक्या जागांवर अजूनही हमरीतुमरी सुरू आहे. कल्याणची जागा शिंदे गटाला सोडण्यात आली आहे मात्र, ठाण्यावर भाजपचा दावा कायम आहे. नाशिकच्या जागेवर भाजपसह शिवसेना आणि राष्ट्रवादीने दावा केला आहे. जागावाटपात भाजपने दांडगाई केल्याने शिंदे गटाचे मंत्री, आमदार संतापले आहेत. कुठल्या तरी सर्वेक्षणाचा आधार दाखवत शिवसेनेला हक्काचे मतदारसंघ नाकारण्यात आले. उमेदवार निवडीत हस्तक्षेप करून उमेदवार बदलण्यास भाग पाडण्यात आले. असेच प्रकार होत राहिले, दादागिरी वाढत राहिली तर विधानसभा निवडणुकीसाठी आपले भविष्य अंधारमय आहे, अशी भीती शिंदे गटाला वाटू लागली आहे. आपल्याला उमेदवारी मिळेल की नाही, याबाबत शिंदे गटाचे आमदार चिंताग्रस्त झाले आहेत. भाजपने कितीही दबाव आणला तरी आपण ठाम भूमिका घ्यावी, अशी मागणी शिंदे गटाच्या नेत्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

शिवसेनेच्या मंत्र्यांची नुकतीच बैठक झाली. त्यात भाजपच्या दबावाला बळी न पडण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली. आपण सर्वांनी उठाव केल्यामुळेच भाजपला सत्तेत सहभागी होता आले याची जाणीव भाजपला करून द्यावी, असा विचार बैठकीत व्यक्त करण्यात आला. बैठकीत आघाडी धर्माची जाणीव करून देण्याचा प्रयत्न झाला. कोणत्या ना कोणत्या कारणाने सत्ता मिळवण्यासाठी एकत्र आलेले राजकीय पक्ष निवडणुकीच्या काळामध्ये मात्र आपला आघाडी धर्म विसरतात. केंद्रीय किंवा राज्य स्तरावर जेव्हा कोणत्या एका पक्षाला स्वबळावर सत्ता मिळविणे शक्य होत नाही तेव्हा मित्र पक्षांची जमवाजमव करून आघाडीचे राजकारण केले जाते. सत्तेत सहभागी होताना सर्वांनाच छान वाटत असले तरी ऐन निवडणुकीच्या कालावधीत मात्र या आघाडी धर्माची कसोटी पाहिली जाते. केवळ सत्तेवर असलेल्या आघाडीमध्येच आघाडी धर्माची आव्हाने निर्माण होतात असे नाही तर विरोधकांच्या आघाड्यांमध्येसुद्धा अशा प्रकारचा अंतर्विरोध दिसून येतो. भाजपच्या दबावामुळे शिंदे यांच्या शिवसेनेला हिंगोलीत उमेदवार बदलावा लागला. वाशिम-यवतमाळमधून ५ वेळा निवडून आलेल्या भावना गवळी यांना उमेदवारी नाकारण्यात आली. परभणी, उस्मानाबादच्या जागा सोडाव्या लागल्या. रायगड, शिरूर हे मतदारसंघ हक्काचे असतानाही मित्र पक्षाला सोडावे लागले. ठाणे, संभाजीनगर जागांसाठी संघर्ष करावा लागत आहे त्यामुळे शिंदे गटात नाराजी आहे.

सर्वसाधारणपणे जेव्हा निवडणुकीच्या निमित्ताने असे विविध पक्ष एकत्र येतात तेव्हा संयुक्तपणे जागा वाटप केले जाते. त्या त्या ठिकाणी उमेदवार निश्चित केले जातात आणि संयुक्तपणे त्याची घोषणा करतात. या वेळी प्रथमच असे घडले की, प्रत्येक घटक पक्ष स्वतंत्रपणे आपल्या जागांची घोषणा करीत राहिला. भाजपने अजित पवार गट असो की एकनाथ शिंदे गट, त्यांच्या जागा कमी करून कमळ चिन्हावर जास्तीत जास्त जागा लढवल्या जाव्यात यासाठी प्रयत्न सुरू केले त्यामुळे असंतोष निर्माण झाला.

या निवडणुकीत कोणत्याही स्थितीत ४०० आकडा पार करण्याचे भाजपचे उद्दिष्ट आहे; परंतु त्यामुळे आपल्या सहकारी मित्र पक्षावर अन्याय होत आहे याकडे मात्र भाजपचे दुर्लक्ष होत आहे. एकनाथ शिंदे गटाने बंडाचे निशाण फडकावत सुरत-गुवाहटीच्या दिशेने कूच केले तेव्हा त्यांना आपल्या पाठीशी 'महाशक्ती' असल्याचा साक्षात्कार घडला. आपल्या मागे महाशक्ती असल्याने चिंता करण्याचे कारण नाही, असे बेईमान आमदारांना सांगण्यात येत होते; परंतु पुढे ही महाशक्ती काय खेळ करणार आहे ते शिंदे गटाच्या लक्षात आले नाही. या महाशक्तीने शिवसेना व धनुष्य-बाणाचे अस्तित्वच नष्ट केले आहे. आम्हीच खरी शिवसेना, असा बोभाटा करणाऱ्या शिंदे गटाचे शेपूट अखेर भाजपने गिळले आहे. शिंदे गटाकडे धड नव्हतेच शेपूटच वळवळ करीत होते ते शेपूटही गिळंकृत झाले. भाजप म्हणजे नक्की काय आहे ते आता शिंदे गटाला कळले असेल.

# दै.राज्य लोकतंत्र वर शुभेच्छांचा वर्षाव...!



## पान १वरून...

### शेतकरी जगाचा पोशिंदा, मग

छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रातून मिळते. राज्यकारभार चालवत असताना छत्रपती शिवरायांनी शेती व शेतकऱ्यांना प्रथम प्राधान्य दिले होते याचे अनेक दाखले त्यांनी आपल्या भाषणात दिले. शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या रोखण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचेही त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी सरकारच्या अनेक योजना आहेत. याची माहिती घेऊन या योजनांचा लाभ शेतकऱ्यांनी घेतला पाहिजे असेही शेटे म्हणाले. सत्कार झालेले सर्वच सरपंच थेट जनतेतून निवडून आले असल्यामुळे त्यांच्यावर मोठी जबाबदारी आहे. गावकऱ्यांना विश्वासात घेऊन विविध योजनांच्या माध्यमातून आदर्श गाव निर्मितीवर सरपंचांनी भर द्यावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच सर्वसामान्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासोबतच शेतकऱ्यांना विशेष प्राधान्य देणारे राज्य लोकतंत्र हे दैनिक कौतुकास पात्र असल्याचेही डॉ.ओमप्रकाश शेटे म्हणाले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संपादक सीमा गणेश मोकाशे व निवासी संपादक गणेश मोकाशे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकतंत्रचे संचालक राजेंद्र मस्के, दत्तात्रेय मस्के, कार्यकारी संपादक अशोक खाडे, उपसंपादक अनिल जाधव, विशाल साळुंखे, वितरण प्रतिनिधी दिलीप शिंगाडे, नागेश क्षीरसागर, अमोल शिंदे, आप्पा महानोर आदींनी परिश्रम घेतले.

------------

### धनंजय मुंडे व पंकजा मुंडे

काँग्रेस पार्टीचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे, भाजपा जिल्हा सरचिटणीस सर्जेराव तांदळे, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष आदित्य सारडा, अविनाश नाईकवाडे, माजी उपनगराध्यक्ष फारुख पटेल, नगरसेवक अमर नाईकवाडे, भा.ज.पा. शहराध्यक्ष तथा नगरसेवक जगदीश गुरखुदे, मुरलीधर ढाकणे, अमर विद्यागर शुभम कातांगळे, संध्याताई राजपुत, राजकुमार जैन, दिलीप चरखा, बालाप्रसाद चरखा, विजय लाहोटी, गोविंद मुंदडा, डॉ. गणेश चरखा, गिरीष मुंदडा, अजिंक्य पगारे, सागर वाहुळ, अभिनंदन सारडा, शुभम ढाकणे, अभिजित आव्हाड, संकेत करवा, अनिकेत उगले, शिवम घाडगे शुभम वीर, यश पेंढारे व इतर नागरिकांची उपस्थिती होती.

----------

### राहुल गांधी १३

नेते आपापल्या उमेदवारांसाठी प्रचार दौरे करत आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी १३ एप्रिलला महाराष्ट्र दौऱ्यावर असणार आहेत. पूर्व विदर्भातील टोकावर असलेल्या भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्राचे काँग्रेसचे उमेदवार डॉ. प्रशांत पडोळे यांच्यासाठी राहुल गांधी सभा घेणार आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी यासाठी राहुल गांधींना विशेष निमंत्रण दिल्याचे समजते. या प्रचारसभेवेळी भंडारा गोंदियाचे काँग्रेसचे उमेदवार डॉ. प्रशांत पडोळे यांच्यासह नागपूरचे उमेदवार विकास ठाकरे, चंद्रपूरच्या उमेदवार प्रतिभा धानोरकर, गडचिरोलीचे उमेदवार नामदेव किरसान, रामटेकचे उमेदवार श्याम कुमार बर्वे येथील उपस्थित राहणार आहेत.

----------

### दै.राज्य लोकतंत्र वर

भागवत तावरे, सुरेश तात्या पाटील, नवनाथ थोटे, काँग्रेस तालुका अध्यक्ष गणेश बजगुडे, नारायण शिंदे, अविनाश नाईकवाडे, एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शेख शफिक, भोसकर, पत्रकार व्यंकटेश वैष्णव, संदीप लवांडे, अविनाश वाघीरकर, धनंजय वाघ, दिनेश मुंदडा, शेकापचे बाळासाहेब घुमरे, प्रा. शिवाजी खांडे, पत्रकार एन.टी.वाघमारे, वाहतूक शाखेचे एपीआय सुभाष सानप, डॉ. तांदळे, डॉ. सानप, लोकमतचे सोमनाथ खताळ, अनिल भंडारी, शिरीष शिंदे, सकाळचे दत्ता देशमुख, नाईक, कार्यारंभचे कार्यकारी संपादक बालाजी मारगुडे, केशव कदम, शुभम खाडे, धनंजय जोगडे, पुढारीचे दत्ता आजबे, पत्रकार चंदन पठाण, रफिक पठाण, शेख वशिम, आत्माराम वाव्हळ, शिवप्रसाद शिरसाट, संपादक जितेंद्र शिरसाठ, संपादक अनिल वाघमारे, नवराष्ट्रचे ब्युरोचिफ रवींद्र उबाळे, प्रारंभ चे संपादक जालिंदर धांडे, पत्रकार बंडू खांडेकर, संतोष स्वामी, प्रकाश काशीद ,महात्मा फुले युवा दल चे संस्थापक ॲड. सतीश शिंदे, डॉ.अनिल राऊत, पोलीस निरीक्षक विलास हजारे, ज्येष्ठ शिक्षक नेते उत्तमराव पवार, रा.स.प.च्या महीला जिल्हाध्यक्षा किरण डोळस, नितीन शिंदे, श्रीमती वीर मॅडम, ॲड.गणेश करांडे, सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, आरटीई चे मनोज जाधव, डॉ.संजय तांदळे, अशोक सुखवसे, सिद्धांत खवतड, पत्रकार मंगेश निटुरकर, लक्ष्मण नरनाळे, दै. दिव्य मराठी चे दिनेश लिंबेकर, आनंद डोंगरे आणि इतर असंख्य हितचिंतकांनी यावेळी दै. लोकतंत्र चे कौतुक करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आता शेतकऱ्यांना खतांचे अनुदान थेट बँक खात्यावर मिळणार?

## कंपन्यांचा पत्ता कट!




पुणे : सध्याच्या घडीला देशामध्ये शेतकऱ्यांना खतांवरील अनुदानासाठी दिली जाणारी रक्कम थेट कंपन्यांना दिली जात होती. मात्र, शेतकऱ्यांऐवजी अनुदानाचा पैसे खत कंपन्यांना देणे. हे देशभरातील शेतकऱ्यांसाठी हिताचे नाही. त्यामुळे आता यापुढे खतांवरील अनुदान रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात दिली जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. त्यानुसार खतांवरील अनुदानासाठीची रक्कम यापुढे कृषी मंत्रालयाच्या अर्थसंकल्पात सादर केली जाणार असल्याची माहिती देखील समोर येत आहे. परिणामी, यापुढे शेतकऱ्यांनी खते खरेदी केल्यानंतर त्यांना थेट अनुदान बँक खात्यावर जमा होणार असल्याचे बोलले जात आहे.

एका सरकारी अधिकाऱ्याने नामांकित वृत्तसमूहाला दिलेल्या माहितीनुसार, शेतकऱ्यांसाठी दिल्या खत अनुदान योजनेत बदल केले जाण्याबाबत सरकारी पातळीवर चर्चा सुरु आहे. केंद्रात पुढील सरकार स्थापन झाल्यानंतर पहिल्या १०० दिवसात ही योजना आणली जाऊ शकते. मात्र, याबाबत सध्या सरकारकडे दोन पर्याय आहेत. एक तर सरकार शेतकऱ्यांच्या थेट खात्यावर पैसे जमा करेल किंवा मग शेतकऱ्यांसाठी कुपन (सवलत व्यवस्था) व्यवस्था लागू केली जाईल. असे सांगितले जात आहे. तसेच केंद्र सरकारकडून याबाबत विचार सुरु झाला असला तरी त्यासाठी थेट शेतकऱ्यांना खत अनुदान द्यायचे झाले तरी सध्याच्या प्रणालीत मोठे बदल करावे लागणार आहे. म्हणजेच सरकारला सर्वात मोठी समस्या अनुदान वितरित करण्याची असणार आहे. सध्याच्या घडीला पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेसाठी असलेल्या प्रणाली सारखीच व्यवस्था सरकारला उभारावी लागणार आहे. असेही या अधिकाऱ्याने म्हटले आहे.

### कसे मिळणार अनुदान?

खत अनुदानावरील रक्कम थेट शेतकऱ्यांना वितरण प्रणाली काहीही असली तरी त्याचा शेतकऱ्यांवर विपरीत परिणाम होणार नाही. शेतकऱ्यांना शेतीच्या हंगामापूर्वी खत अनुदानाचे पैसे दिले जातील. जेणेकरून शेतकऱ्यांना संपूर्ण हंगामात मुबलक प्रमाणात खते मिळून अनुदान देखील शेत शेतकऱ्यांनाच मिळेल. यासाठी कुपन व्यवस्था एकदम परफेक्ट मानली जात आहे. ज्यानुसार शेतकऱ्याला हंगामातील एकूण पिकांच्या गरजेनुसार कुपन दिले जातील. हे कुपन दुकानदाराकडे दिल्यास शेतकऱ्यांना, त्या मागणीनुसार अनुदान व खते मिळतील. तसेच या कूपनच्या आधारे शेतकरी सेंद्रिय खते आणि कीटकनाशके देखील खरेदी करू शकणार आहे. असेही या अधिकाऱ्याने म्हटले आहे.

# राजे यशवंतराव होळकर महामेश योजना; जाणून घ्या सविस्तर माहिती




महाराष्ट्रात ग्रामीण भागात अनेक शेतकरी शेती सोबतच शेळी-मेंढी पालन करत आहेत, परंतु अलीकडच्या काळात अनेक कारणांमुळे राज्यात शेळ्या-मेंढ्यांची संख्या कमी होत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे राज्यातील शेळ्या-मेंढ्यांची घट रोखण्यासाठी व मेंढीपालन व्यवसायाला चालना देण्यासाठी राज्य सरकारकडून विविध उपाय योजना केल्या जातात. त्यापैकी एक म्हणजे राजे यशवंतराव होळकर महामेश योजना. मुंबई आणि मुंबई उपनगरे वगळून राज्यातील उर्वरित ३४ जिल्ह्यांमध्ये ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत एकूण ६ घटकांचा समावेश करण्यात आला असून त्यासाठी रू. ४५.८१ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

काय आहे योजना : ही योजना फक्त भटक्या जमाती (भज-क) वर्गातील लाभार्थ्यांना लागू असेल. योजनेंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून मेंढी पालनासाठी लाभार्थ्यांना ७५% अनुदान दिले जाते. तसेच मेंढीच्या चाऱ्यासाठी ५०% अनुदान दिले जाते. या योजने अंतर्गत लाभार्थ्यांची निवड करताना महिलांसाठी ३०% आणि अपंगांसाठी ३% आरक्षण देण्यात आले आहे. कायमस्वरूपी एका ठिकाणी राहून मेंढीपालन करण्याकरिता पायाभूत सोई सुविधेसह २० मेंढ्या + १ मेंढानर असा मेंढीगट ७५% अनुदानावर वाटप करणे (स्थायी)

स्थलांतर पद्धतीने मेंढीपालन करण्याकरिता पायाभूत सोई सुविधेसह २० मेंढ्या + १ मेंढानर असा मेंढीगट ७५% अनुदानावर वाटप करणे (स्थलांतरीत) ज्यांच्याकडे स्वत:चे २० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, ४० पेक्षा कमी मेंढ्या आहेत, अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचा १ नरमेंढा ७५% अनुदानावर वाटप करणे. ज्यांच्याकडे स्वत:चे ४० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, ६० पेक्षा कमी मेंढ्या आहेत, अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचा २ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. ज्यांच्याकडे स्वत:चे ६० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, ८० पेक्षा कमी मेंढ्या आहेत, अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचा ३ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. ज्यांच्याकडे स्वत:चे ८० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, १०० पेक्षा कमी मेंढ्या आहेत, अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचा ४ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. ज्यांच्याकडे स्वत:चे १०० किंवा त्यापेक्षा अधिक मेंढ्या आहेत, अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचे ५ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. ज्यांच्याकडे स्वत: च्या २० मेंढ्या व १ मेंढानर अशा एकूण २१ मेंढ्या किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, ४० मेंढ्यापेक्षा कमी अशा मेंढ्यांच्या एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थायी) ज्यांच्याकडे स्वत: च्या २० मेंढ्या व १ मेंढानर अशा एकूण २१ मेंढ्या किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, ४० मेंढ्यापेक्षा कमी अशा मेंढ्यांच्या स्थलांतरीत स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थलांतरीत) ज्यांच्याकडे स्वत: च्या ४० मेंढ्या व २ मेंढानर अशा एकूण ४२ मेंढ्या किंवा त्यापेक्षा अधिक अशा मेंढ्यांच्या एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थायी) ज्यांच्याकडे स्वत: च्या ४० मेंढ्या व २ मेंढानर अशा एकूण ४२ मेंढ्या किंवा त्यापेक्षा अधिक अशा मेंढ्यांच्या स्थलांतरीत स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थलांतरीत) एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी संतुलित खाद्य उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थायी), १ (१०० ग्रॅम प्रति दिन प्रति मेंढी याप्रमाणे माहे एप्रिल ते जुलै या ४ महिन्याच्या कालावधी करिता) भटकंती करणारे स्थलांतरीत स्वरूपाच्या मेंढी पालनासाठी संतुलित खाद्य उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थलांतरीत), (१०० ग्रॅम प्रति दिन प्रति मेंढी याप्रमाणे जून ते जुलै या २ महिन्याच्या कालावधी करिता)

महामेश योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे :आधार कार्ड, शिधापत्रिका, रहिवासी पुरावा, मोबाईल नंबर, ई मेल आयडी, पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, जमिनीची कागदपत्रे, जमिनीतील सह-भागीदारांचे ना हरकत प्रमाणपत्र, पशुपालन प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र, वयाची नोंदणी, उत्पन्न प्रमाणपत्र.

योजनेंतर्गत अर्ज करण्याची प्रक्रिया : सदर योजनेंतर्गत अर्जदारांनी केवळ ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे, कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन पद्धतीने किंवा इतर कोणत्याही मार्गाने अर्ज करता येणार नाही, यासाठी ऑनलाइन पद्धती्ु.ारहराशीह.ळप या महामंडळाच्या वेबसाईट वरून किंवा मोबाइल व्दारे ॲप वापरून अर्ज करता येणार आहे.

# शेळीपालनातील चाऱ्याचे नियोजन आणि व्यवस्थापन

पशुपालकांचा जवळजवळ ५० ते ६० टक्के खर्च हा जनावरांच्या आहारावर होतो. त्यामुळे कमीत कमी खर्चात जनावरांना चांगल्या पद्धतीचा पौष्टिक चारा कसा उपलब्ध करून देऊ शकतो यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. जनावरांना वर्षभर चारा मिळावा म्हणून आपण वेगळ्या पद्धतीने चाऱ्याची साठवण करू शकतो आणि जनावराची चाऱ्याची गरज भागवू शकतो.

शेळयांच्या आहारामध्ये मुख्यत्वेकरून झाडपाल्याचा उपयोग केला जातो. असा चारा वाढून सुद्धा दिला जातो त्यामुळे गोठ्याच्या आजूबाजूला अशा झाडांची लागवड करून तुम्ही चाऱ्यावरील खर्च कमी करू शकतात. शेळ्यांच्या वाढीसाठी आवश्यक असणारा चारा वर्षभर उपलब्ध राहण्यासाठी चाऱ्याचे वर्षभरासाठी व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. फायदेशीर शेळीपालनासाठी वर्षभर शेळ्यांच्या आहारामध्ये हिरव्या आणि वाळलेल्या चाऱ्याचा समावेश असायला हवा. शेळीला तिच्या वजनाच्या चार ते पाच टक्के शुष्क पदार्थांची आवश्यकता असते.पशुखाद्याचा विचार केला तर त्याच्यात ९०%,सुक्या चाऱ्यामध्ये ८९ टक्के आणि हिरव्या चाऱ्यामध्ये २० टक्के शुष्क पदार्थ असतात. तसेच एकदल धान्य पिकांमध्ये प्रथिनांचे प्रमाण सात ते अकरा टक्के असते. तर एकूण पचनीय पोषकतत्वे ६५ ते ७० टक्के असतात. त्याचप्रमाणे द्विदल धान्य पिकांमध्ये प्रथिनांचे प्रमाण १६ ते २० टक्केआणि एकूण पचनीय पोषक तत्वांचे प्रमाण ६० ते ६५ टक्के असते. जर आपण वाळलेल्या चाऱ्याचा विचार केला तर त्यामध्ये प्रथिनांचे प्रमाण चार ते सहा टक्के असते आणि एकूण पचनीय पोषक तत्वांचे प्रमाण ५० ते ५५ टक्के असते. एकदल चारा पिकांमध्ये मका, कडवळ, बाजरी, ज्वारी, दशरथ घास, गिनी गवत इत्यादींचा समावेश होतो. तसेच द्विदल चारा पिकांमध्ये लसूण घास, बरसीम, भुईमूग, चवळी, सोयाबीन इत्यादी चारा पिकांचा समावेश होतो. शेळयांमध्ये चाऱ्याचे योग्य रित्या पचन व्हावेत यासाठी आहारामध्येवाळलेला चारा,हिरवा चारा, खुराक आणि मिनरल मिक्स्चर असणे आवश्यक आहे.

०००

चाऱ्याचे नियोजन आणि व्यवस्थापन

१) शेळ्यांना वर्षभर चारा मिळावा म्हणून आपण वेगळ्या पद्धतीने चाऱ्याचे साठवणूक करू शकतो. त्यामुळे सुखा चारा वर्षभर साठवून ठेवावा अशा पद्धतीने साठवावा.सुक्या चाऱ्यावर अथवा भुसावर युरियाची प्रक्रिया करावी.

२) हायड्रोपोनिक चारा तयार करणे उत्तम असते. ३) अझोला तयार करणे. ४) मुरघास बनवून ठेवणे. ५) शेळ्यांसाठी घरच्या घरी पशुखाद्य तयार करणे. ६) शेळ्यांसाठी चारा म्हणून सुबाभूळ, शेवरी, अंजन वृक्ष इत्यादी झाडाची लागवड करू शकता. तसेच डी एच एन ६, गिनी गवत, पॅरा गवत, नेपियर, सुदाम गवत, दीनानाथ गवत, मारवेल इत्यादी चाऱ्याची लागवड करता येते. ७) तसेच शेतामध्ये आपण घेतो चे पीक घेतल्यानंतर उरलेला पालाशेळ्यांमध्ये चारा म्हणून वापरू शकता. फक्त यामध्ये जाड खोड असलेले पीक वापरणे टाळावे. योग्य चारा नियोजन करून आपण शेळीपालनातील नफा चे प्रमाण वाढू शकतो.






### जागतिक दिवस:
### 'जागतिक कोंकणी भाषा दिन'

#### महत्वाच्या घटना

१८७५ : महर्षी स्वामी दयानंद यांनी आर्य समाजाची स्थापना केली.
१८८९ : भारतीय कलाविष्कार,जिम्नॅस्ट, बलूनिस्ट, पॅराशूटिस्ट आणि देशभक्त रामचंद्र चटर्जी गरम फुग्यातुन उड्डाण करणारे तसचं, पॅराशूटमध्ये उतरणारे पहिले भारतीय नागरिक ठरले.
१९१२ : इंग्लंडमधील साऊथॅम्प्टन बंदरातुन 'टायटॅनिक' जहाजाचे पहिल्या (व शेवटच्या) सफरीवर प्रयाण.
१९१७ : गांधी चंपारण्याला आगमन
१९५५ : योहान साल्क या शास्त्रज्ञाने सर्वप्रथम पोलिओ लशीची यशस्वी चाचणी केली.
१९७० : पॉल मेकार्टनीने व्यक्तिगत आणि व्यावसायिक कारणास्तव द बीटल्स सोडण्याचे जाहीर केले.
१९८२ : भारताचा पहिला उपग्रह इन्सॅट वन याचे अंतराळात उड्डाण.
२००१ : भारत व इराण या दोन देश दरम्यान तेहरान घोषणा पात्रांवर हस्ताक्षर करण्यात आले.

#### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७५५ : डॉ. सामुएल हानेमान, होमिओपॅथीचे जनक.
१८४३ : रामचंद्र भिकाजी गुंजीकर - 'मोचनगड' या मराठीतील पहिल्या ऐतिहासिक कादंबरीचे लेखक आणि 'विविध ज्ञानविस्तार' मासिकाचे संपादक (मृत्यू: १८ जून १९०१)
१८४७ : जोसेफ पुलित्झर - हंगेरीयन-अमेरिकन राजकीय नेते आणि प्रकाशक, वृत्तपत्र क्षेत्रात विशेष कामगिरी बजावणार्यांना देण्यात येणार्या पुलित्झर पुरस्कारांचे प्रवर्तक (मृत्यू: २९ आक्टोबर १९११)
१८८० : सर सी. वाय. चिंतामणी - स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रागतिक पक्षाचे नेते व श्रेष्ठ वृत्तपत्रकार, पहिल्या गोलमेज परिषदेचे विशेष अतिथी, उत्तरप्रदेशचे शिक्षणमंत्री (मृत्यू: १ जुलै १९४१)
१८९४ : घनश्यामदास बिर्ला - व्यापारी पार्श्वभूमीतून पुढे येऊन पुढे प्रचंड औद्योगिक साम्राज्य उभारलेले उद्योगपती (मृत्यू: ११ जून १९८३)
१८९७ : भारतीय लेखापाल आणि राजकारणी प्रफुल्लचंद्र सेन यांचा जन्म. (मृत्यू: २५ सप्टेंबर १९९०)
१९०१ : डॉ. धनंजय रामचंद्र तथा द. रा. गाडगीळ - अर्थशास्त्रज्ञ, भारतीय अर्थशास्त्राचे प्रणेते, सहकारी चळवळीचे खंदे समर्थक, पुणे विद्यापीठाचे कुलगुरु (मृत्यू: ३ मे १९७१)
१९०७ : मोतीराम गजानन तथा मो. ग. रांगणेकर - नाटककार, चित्रपट दिग्दर्शक व पत्रकार (मृत्यू: १ फेब्रुवारी १९९५)
१९१७ : भारतीय राजकारणी जगजितसिंह लयलपुरी यांचा जन्म. (मृत्यू: २७ मे २०१३)
१९२७ : मनाली कल्लट तथा एम. के. वैणू बाप्पा - भारतीय खगोलशास्त्रज्ञ. तार्यांची प्रत आणि त्यांच्या वर्णपटातील परस्परसंबंधांची उकल केली. (मृत्यू: १० ऑगस्ट १९८२)
१९२८ : परमवीर चक्र सन्मानित भारतीय सैन्य दलाचे माजी लेफ्टनंट कर्नल धनसिंग थापा यांचा जन्मदिन.
१९३१ : किशोरी आमोणकर - शास्त्रीय गायिका
१९३५ : भारतीय जयपूर घराण्याच्या शास्त्रीय गायीका, शास्त्रीय शैली ख्याल आणि हलकी शास्त्रीय शैली ठुमरी आणि भजन गानसम्राज्ञी किशोरी रवींद्र आमोणकर यांचा जन्मदिन.
१९५२ : भारतीय राजकारणी नारायण राणे यांचा जन्म.
१९७२ : स्काईप चे सहसंस्थापक प्रेसिंड कासासुलु यांचा जन्म.
१९७५ : भारतीय नर्तक आणि कोरिओग्राफर टेरेंस लुईस यांचा जन्म.

#### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३१७ : संत गोरा कुंभार.
१६७८ : थोर विदुषी वेणाबाई -रामदासस्वामींची मानसकन्या, प्रवचनकार .
१८१३ : जोसेफ लाग्रांगे - इटालियन गणितज्ञ (जन्म: २५ जानेवारी १७३६)
१९३१ : खलील जिब्रान - लेबनॉनमधे जन्मलेले अमेरिकन कवी, लेखक व कलाकार (जन्म: ६ जानेवारी १८८३)
१९३७ : डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर - ज्ञानकोशकार. 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' हे त्यांचे सर्वात महत्त्वाचे कार्य होय. (जन्म: २ फेब्रुवारी १८८४ रायपूर, मध्य प्रदेश)
१९४९ : बिरबल सहानी - पुरावनस्पती शास्त्रज्ञ, राष्ट्रीय विज्ञान अकादमीचे अध्यक्ष (जन्म: १४ नोव्हेंबर १८९१ सहारणपूर, उत्तर प्रदेश)
१९६५ : डॉ. पंजाबराव देशमुख - स्वतंत्र भारताचे पहिले कृषी मंत्री, विदर्भात त्यांनी केलेले शिक्षणप्रसाराचे कार्य कर्मवीर भाऊराव पाटलांच्या तोडीचे मानले जाते. (जन्म: २७ डिसेंबर १८९८)
१९९५ : मोरारजी देसाई - भारताचे ४ थे पंतप्रधान, स्वातंत्र्यसेनानी व गांधीवादी नेते, 'भारतरत्न' (जन्म: २९ फेब्रुवारी १८९६)
२००० : डॉ. श्रीधर भास्कर तथा 'दादासाहेब' वर्णेकर - संस्कृत पंडित (जन्म: ३१ जुलै १९१८).

# पुंगनूर गाईंच्या दूधात औषधी गुणधर्म; मात्र गाय होतेय नामशेष

पुंगनूर गाय ही मुख्यतः आंध्र प्रदेशमधील चित्तूर जिल्ह्यात आढळते. या गायीचे वैशिष्ट्य म्हणजे ही गाय केवळ पाच किलो चाऱ्यासह दररोज तीन लिटर दूध देण्यास सक्षम आहे. अशा परिस्थितीत जगातील सर्वात लहान गाय म्हणून पुंगनूर गायची ओळख आहे.

भारतात गायींच्या अनेक उत्कृष्ट जाती आढळतात. देशात गायींच्या काही जाती आहेत ज्या हळूहळू नामशेष होत आहेत. गायींच्या नामशेष होणाऱ्या जातींमध्ये पुंगनूर गाय आहे. ही गाय जगातील सर्वात लहान गायींपैकी एक आहे. गायीची ही उत्कृष्ट जात दक्षिण भारतात विकसित करण्यात आली आहे. ही गाय नामशेष झाल्यामुळे आंध्र प्रदेशात मोठ्या प्रमाणावर तिच्या संवर्धनावर काम केले जात आहे, जेणेकरून तिला नामशेष होण्यापासून वाचवता येईल. पुंगनूर गाय ही मुख्यतः आंध्र प्रदेशमधील चित्तूर जिल्ह्यात आढळते. या गायीचे वैशिष्ट्य म्हणजे ही गाय केवळ पाच किलो चाऱ्यासह दररोज तीन लिटर दूध देण्यास सक्षम आहे.

लहान आकारासाठी प्रसिद्ध : पुंगनूर गायीची उंची जवळपास कुत्र्याएवढी असते. म्हणजेच अडीत ते तीन फुट असते. पशुपालकांना ही गाय पाळणे खूप सोपे आहे. कारण ती चारा जास्त प्रमाणात खात नाही. ती एका दिवसात पाच किलो चारा खाते आणि तीन लिटर दूध देते. पुंगनूर गायीची जात जुनी मानली जाते. ही गाय देशातील जवळपास सर्वच राज्यात सहज पाळता येते.

पुंगनूर गाईचे दूध हे औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण : पुंगनूर गाईचे दूध हे औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. वास्तविक, त्याच्या दुधामध्ये सुमारे ८ टक्के फॅट असते, जे मानवी शरीरासाठी खूप फायदेशीर आहे. त्याच वेळी, इतर गायींच्या दुधात ३ ते ३.३५ टक्के फॅटचे प्रमाण आढळते.

पुंगनूर गाय कशी ओळखावी : पुंगनूर गाय/ पुंगनूर गायीची उंची खूपच लहान असते. अशा स्थितीत या गायीचा मागचा भाग किंचित खाली झुकलेला असतो. याशिवाय या गायीची शिंगे वाकडी असून तिची पाठ पूर्णपणे सपाट असते. पुंगनूर गायींचा बहुतेक रंग पांढरा असतो.



# श्रीक्षेत्र रामगडामुळे भाविक भक्तांना ऊर्जा मिळते

## आगामी काळात गडाचा कायापालट होईल- राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र रामगडा मुळे लाखो भक्तांना ऊर्जा मिळते. धर्म संस्कार आणि जागृतीचे अखंड कार्य गडावरून चालते. महंत स्वामी योगीराज महाराज गडाच्या सर्वांगीन विकासासाठी अथक परिश्रम घेत आहेत. अनेक गावांमध्ये रामगडाचे सप्ताह स्वयंस्फूर्तीने उभे राहिले. गडाच्या विकासासाठी अनेक माणसे जोडली गेली. गडाच्या विकासाला गती मिळाली. ही किमया गडाचे महंत स्वामी योगीराज महाराज यांची आहे. गडावर रस्ता,लाईट, पाणी,वीज, भक्त निवास सर्व भौतिक सुविधा निर्माण करण्यासाठी आपण कायम प्रयत्नशील आहोत. महाराजांचे मार्गदर्शन, भक्तांचा तन मन धनाने मिळाणारा पाठींबा आणि माझे प्रयत्न यातून आगामी काळात निश्चितपणे राम गडाचा काया पालट होईल. असा विश्वास राम गडाचे विश्वस्त तथा भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी रामगड येथे अखंड हरीनाम सप्ताह आरंभ प्रसंगी व्यक्त केला.



आज रामनवमी निमित्त दरवर्षी प्रमाणे लाखो भक्तांचे श्रद्धेय स्थान श्रीक्षेत्र रामगड येथे ४५ वा नारळी अखंड हरिनाम सप्ताह व संगीत राम कथाचा शुभारंभ महंत स्वामी योगीराज महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली, हभप भवानीमहाराज भवानवाडी, ह.भ.प. आत्माराम बाबा यांच्या प्रमुख उपस्थितीत विधिवत पूजा करून सप्ताह आरंभ झाला. यावेळी माजी मंत्री बदामराव पंडित, शिवसेना नेते कुंडलिक खांडे, वंचित बहुजन आघाडी नेते अशोकराव हिंगे, दिलीपराव गोरे, प्रा. देविदास नागरगोजे, बालाजी पवार, विश्वस्त रामा बांड,शिवाजीराव निकम, इंजी. विष्णू देवकते, चेअरमन कल्याणराव पवार, नरेश पवार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व पंचक्रोशीतील रामभक्त बहुसंख्येने उपस्थित होते. अखंड हरीनाम सप्ताह आरंभ दि. १० एप्रिल २०२४ ते सांगता १७ एप्रिल २०२४ ला होईल. यादरम्यान ह.भ.प. समाधान महाराज शर्मा ( केज ) यांची संगीत रामकथा आयोजित असून, भगवान गडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री महाराज, ह.भ.प. मच्छिंद्र महाराज निकम (नेवासा), ह.भ.प.नवनाथ बाबा ( गोरक्षनाथ टेकडी), ह.भ.प. केशव महाराज (उकळीकर), ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज तांबे (नेवासा), समाधान महाराज शर्मा (केज), बाळू महाराज (गिरगावकर) यांचे सायंकाळी हरी कीर्तन संपन्न होईल. तर १७ एप्रिल रोजी महंत स्वामी योगीराज महाराज यांच्या काल्याचे कीर्तन व महाप्रसादाने सांगता संपन्न होईल. सर्व भाविक भक्तांनी या अखंड हरीनाम सप्ताह सोहळ्याचा लाभ घ्यावा. असे आवाहन विश्वस्त मंडळाकडून करण्यात आले आहे.

# दत्त मंदिर जिर्णोद्धार कामाचा शुभारंभ



बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील बालाघाट दत्त संस्थान येथील दत्त मंदिर जिर्णोद्धाराचा शुभारंभ ह.भ.प. हरीहर महाराज आणि लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या हस्ते मंगळवार ( दि.९ ) सकाळी ११ वाजता गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर करण्यात आला.

गुढीपाडवा व नवीन वर्षाच्या शुभ मुहूर्तावर कपीलधार वाडी ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या बालाघाट संस्थान येथील दत्त मंदिर जिर्णोद्धाराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. श्री महंत ह.भ.प.हरिहर भारती महाराज श्रीक्षेत्र तपोवन मोरेश्वर संस्थान कोळवाडी, ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे , मठाधिपती श्री संस्थान बंकट स्वामी मठ नेकनूर याच्या शुभहस्ते शुभारंभ करण्यात आला. यावेळी विश्वनाथ स्वामी कपिलधार संस्थान पुजारी, डॉ.त्रिंबक नागनाथ स्वामी कपिलधार, सुशील रसाळ मांजरसुंबा यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच नवनाथ दगडू शिंदे , आजिनाथ दगडू शिंदे, वैजिनाथ दगडू शिंदे, मिठू शिंदे,गोरख शिंदे,संतराम शिंदे,केशव शिंदे, सुरेश शिंदे, सुंदरराव बलभीम शिंदे,अश्रुबा शिंदे, उत्तम शिंदे, विठ्ठल शिंदे,बबन तात्याबा शिंदे, ज्ञानेश्वर महादेव शेलार, विक्रम वाघिरे, आकाश वाघिरे, शेषराव चव्हाण, राम काटे, अमोल ढास, व्यंकटेश ननवरे, देविदास माने, सचिन इटकर,ऊलास भड , रावसाहेब सुदाम घोडके, अश्रुबा गवळी, किरण सर्जेराव गायकवाड, सोमेश्वर महादेव शिंदे, गणेश शिंदे ,अमोल शिंदे, जोगदंड, गणेश उनवणे यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तसेच येणाऱ्या मान्यवरांचे वैजिनाथ दगडु शिंदे आणि वाघेश्वरी मित्रमंडळाच्या वतीने स्वागत व परिश्रम घेण्यात आले.

# देशात संविधान संस्कृती जोपासावी- प्रा.कांबळे

बीड । प्रतिनिधी

देशात धर्म संस्कृती ऐवजी संविधान संस्कृती जोपासावी, कारण त्यातच कल्याणाचा खरा मार्ग आहे. धर्म माणसामाणसात भेदभाव निर्माण करतो. त्यामुळे समाजाची प्रचंड हानी होते. भारतीय संविधान प्रत्येकाला स्वातंत्र्यपणाने जगण्याचा अधिकार देते. असे विचार प्रा.आशालता कांबळे यांनी व्यक्त केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त बीड शहरातील सामाजिक न्याय भवन येथे १ ते १४ एप्रिल या कालावधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने मंगळवार (दि.९) एप्रिल रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी प्रा.आशालता कांबळे बोलत होत्या. यावेळी अध्यक्ष म्हणून प्रा. छायाताई खोसे तर प्रमुख पाहुणे म्हणून मनिषाताई तोकले, लता चव्हाण, सुनंदा तांदळे, मीना देवकते यांची उपस्थिती होती.



यावेळी उपस्थित समुदायास संबोधित करतांना प्रा.आशालता कांबळे म्हणाल्या की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मामुळे कोटी कुळांचा उद्धार झाला आहे. या देशात धर्म संस्कृतीने हजारो वर्ष माणूस गुलाम ठेवला.मनुस्मृती सारख्या ग्रंथाची निर्मिती करुन जाती निर्माण केल्या, एवढंच नव्हे तर त्या काळी समानतेला विरोध करणाऱ्या व्यक्तींना आज नावाजले जात आहे, ही बाब चिंतेची आहे. खासकरुन भारतातील महिलांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना निट समजून घेण्याची गरज आहे. कारण महिलांचे जगणे म्हणजे बाबासाहेबांनी मिळवून दिलेला हिंदू कोड बील एक हक्क आहे. डॉ.बाबासाहेबांची विद्वता मोजण्यासाठी कोणतेही मोजमाप नाही. केवळ भारतातच नव्हे तर जगातल्या अन्य देशातही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी होते. एवढ्या महान उंचीचे बाबासाहेब आहेत. असे विचार प्रा.आशालता कांबळे यांनी व्यक्त केले. या व्याख्यान मालेचे प्रास्ताविक अरुणाताई आठवले यांनी केले. सुत्रसंचालन शैलजा ओव्हाळ यांनी तर आभार प्रा.अनिता शिंदे यांनी मानले. यावेळी आंबेडकरी जनतेची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या व्याख्यान मालेचा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने मोलाचे परिश्रम घेतले.

# गरीब विद्यार्थ्यांना सुरेश नवले यांच्या हस्ते सायकलचे वाटप

बीड । प्रतिनिधी

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर घोलप क्लासेस च्या वतीने गरीब व गरजू विद्यार्थ्यांना २१ सायकलचे वाटप कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा माजी मंत्री सुरेश नवले यांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे जेष्ठ नेते नवनाथ शिराळे , दैनिक सूर्योदयचे कार्यकारी संपादक दिपक काळकुटे, नगरसेवक रवींद्र कदम डॉक्टर सचिन वारे, प्रतिष्ठित व्यापारी जितेंद्र कासट, शिवाजी जाधव, धर्मेश कदम, श्रीहरी धुपड, हितेशजी पटेल, प्रफुल्ल बागमार, संकेत कदम, युवराज कदम, श्रीकांत कदम यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक घोलप क्लासेस चे मालक घोलप सर यांनी केले.

याबाबत अधिक माहिती अशी की दि.९ एप्रिल मंगळवारी गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर घोलप क्लासेसच्या वतीने गरजू गरीब विद्यार्थ्यांना कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मंत्री सुरेश नवले यांच्या हस्ते २१ सायकलचे वाटप करण्यात आले या कार्यक्रमाला अध्यक्ष भाषण करताना माजी मंत्री सुरेश नवले यांनी आपले मत



### माजी विद्यार्थ्यांचा केला सत्कार

सायकल वाटपाच्या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित असलेले घोलप क्लासेसचे माजी विद्यार्थी सीमा एम्पोरियम चे मालक हरीओमजी धुप्पट, प्रगती प्लायवूड हितेजी पटेल, नवकार फूडचे मालक प्रफुल्ल बागमार ,संकेत कदम, युवराज कदम, श्रीकांत कदम या माझी विद्यार्थ्यांचा सत्कार करून घोलप क्लासेसच्या वतीने अनोखा उपक्रम साजरा करण्यात आला.

मांडताना घोलप सर यांच्या मैत्री बद्दल जुन्या आठवणींना उजाळा दिला त्यांनी आपल्या भाषणात घोलप सरने केलेल्या मागील ३५ वर्षाच्या कामाचा आवर्जून उल्लेख केला ते घोलप सर बद्दल बोलताना म्हणाले की घोलप सर हे खूप प्रतिकूल परिस्थितीतून आलेले असून त्यांना गरिबीची जाण आहे त्यांच्या स्वतःच्या परिस्थितीचा त्यांना अनुभव असल्यामुळे ते ग्रामीण भागातल्या व शहरी भागातल्या गरीब विद्यार्थ्यांना आपल्या क्लासेस मध्ये कमीत कमी फीस मध्ये शिक्षण देतात व ज्यांच्याकडे पैसे नसतील अशा विद्यार्थ्यांना पैशांमध्ये सूट देऊन शिक्षण देतात असेच एक उदाहरण देताना नवले साहेब म्हणाले की मराठा आरक्षणाच्या विषयावर जगन्नाथ काळकुटे या तरुणाने आत्महत्या केली त्या तरुणाच्या मुलीला आणि मुलाला घोलप सर मोफत शिक्षण देत आहेत व त्या विद्यार्थ्यांना त्यांनी सायकल ही दिली आहे असे अशा अनेक विद्यार्थ्यांना घोलप सरने मदत केलेली असून घोलप सर च्या क्लासेस मधून शिक्षण घेतलेल्या अनेक विद्यार्थी मोठ्या पदावर पोहोचले असून ते सर्व श्रेय घोलप सर यांचे आहे सायकल वाटप कार्यक्रमाचे अभिनंदन ही केले यासह अनेक आठवणींना उजाळा सुरेश नवले यांनी दिला सुरेश नवले पुढे बोलताना म्हणाले की विद्यार्थ्यांनीही आपलं भविष्य स्वतः बनवायचे असते त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी स्वतः काहीतरी होण्याच्या अपेक्षेने शिक्षण घ्यावे असे माजी मंत्री नवले यांनी विचार व्यक्त करताना सांगितले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून आलेले नवनाथांना शिराळे यांनी आपले मत मांडताना घोलप सर यांचे कौतुक केले. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्लासेस मधील शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात मेहनत घेतली या कार्यक्रमात सायकल वाटप केल्यानंतर विद्यार्थ्यांनीही घोलप सर यांचे आभार मानले.

# बंकटस्वामी महाराज यांच्या नावाला साजेसे दर्जेदार काम करण्यासाठी श्री. बंकटस्वामी शिक्षण संस्था कटिबद्ध -घरत

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या आणि मराठवाड्याच्या शैक्षणिक क्षेत्रामध्ये मोठे योगदान श्री. बंकटस्वामी शिक्षण संस्थेचे आहे. वारकरी संप्रदायामधील महान संत श्री. बंकटस्वामी महाराजांच्या नावाने ही संस्था स्थापन करण्यात आली. संस्था स्थापनेचा जो उद्देश आहे. तो सर्वसामान्यांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण देणे. त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आनणे. हा उद्देश सार्थ करण्यासाठी आणि श्री. बंकटस्वामी महाराज यांच्या नावाला साजेसे दर्जेदार काम करण्यासाठी सर्व कार्यकारी मंडळ सदैव कटिबद्ध आहे. असे प्रतिपादन संस्था सचिव श्री. मच्छिंद्र अण्णा घरत यांनी केले. बीड येथील श्री. बंकटस्वामी महाविद्यालयात श्री. बंकटस्वामी शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यालयाचे उद्घाटन गंगाभारती हरीहर महाराज यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी घरत बोलत होते. या कार्यक्रमाला व्यासपीठावर संपादक



वैभव स्वामी, ह. भ. प. सुरेश महाराज जाधव, संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. गणेश पोकळे,माजी प्राचार्य डॉ. बिभीषण भैरट, संस्थेचे सदस्य भाऊसाहेब मुंडे, बद्री शिंदे, सुरेश साबळे, ज्ञानेश्वर घरत, प्राचार्य डॉ. विवेक मिरगणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना घरात म्हणाले की, या शिक्षण संस्थेची शिक्षण क्षेत्रामध्ये उज्वल परंपरा आहे. समाजातील तळागाळातील सर्वसामान्य मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात घेऊन येण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून ही संस्था करत आहे. वारकरी संप्रदायामधील महान संत श्री. बंकटस्वामी महाराज यांच्या नावाने ही संस्था कार्यरत आहे. त्यांच्या नावाला साजेसे कार्य हे कार्यकारी मंडळ आगामी काळात करून संस्थेचा नावलौकिक करेल असेही घरत म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. गणेश पोकळे यांनी केले. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना सुरेश महाराज जाधव म्हणाले की, वारकरी संप्रदायामधील बंकटस्वामी महाराज चालते बोलते विद्यापीठ होते. भक्तीचा सुर्य बंकटस्वामी महाराज आहेत. संस्थेचा नावलौकिक करण्यासाठी बंकटस्वामी संस्थान परिवार नवनिर्वाचित कार्यकारी मंडळाच्या पाठीशी सदैव आहे. आपले मनोगत व्यक्त करताना संपादक वैभव स्वामी म्हणाले, संस्थेच्या पुढील वाटचालीमध्ये पत्रकारिता क्षेत्र म्हणून आम्ही सदैव सोबत राहू. अशा प्रकारच्या शुभेच्छा दिल्या. डॉ. बिभीषण भैरट, प्राचार्य डॉ. विवेक मिरगणे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित कार्यकारी मंडळाचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.बप्पासाहेब हावळे यांनी केले. तर शेवटी आभार हाकदार यांनी मानले. या कार्यक्रमाला रमेश पाटील, महादेव खोसे, शहाजी कोल्हे, प्रा. प्रमोद जाधव, प्रा. प्रशांत माने, प्रा. वैद्य, श्रीकृष्ण जाधव, प्रशांत कोल्हे, दत्ता जगदाळे,सुपेकर,खरसाडे, सपकाळ, लेणे कर्मचारी संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उद्धरली कोटी कुळे भीमा तुझ्या जन्मामुळे!

## सांस्कृतिक : जयभिम महोत्सवात भिमगित गायन स्पर्धा

बीड । प्रतिनिधी

मानवाला मानवाचे अधिकार मिळवून देणारे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विश्वातल्या अनेक देशात साजरी होते. त्या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त मंगळवार (दि.९) एप्रिल रोजी भिमगीत गायन स्पर्धा पार पडली.या स्पर्धेत सर्वच गटातील नवोदित गायकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी भीमगीते गायली.त्यामुळे उपस्थित जनतेने भरभरुन दाद दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे १ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या जयभिम महोत्सवात मंगळवार (दि.९) एप्रिल रोजी भीमगीत गायन स्पर्धा पार पडली. या




स्पर्धेला उदघाटक म्हणून अजय सवाई, प्रमुख पाहुणे म्हणून सत्यनारायण ढाका, विजय हातागळे, अप्पा मिसळे, अशोक तांगडे, राजू जोगदंड आदी उपस्थित होते. या जयभिम महोत्सवाच्या संकल्पनेमुळे नवोदित कलाकारांना आपल्या सुप्त कलागुणांना वाव मिळवून देण्याची एक संधी मिळाली. या भिमगित गायन स्पर्धेचे प्रास्ताविक अजय सवाई यांनी केले. सूत्रसंचालन सुमेध जोगदंड, प्रा. पांडुरंग सुतार, यांनी तर आभार प्रा. अशोक गायकवाड यांनी व्यक्त केले. परिक्षक म्हणून प्रा.सुरेश थोरात, विजेंद्र सरकटे यांनी काम पहिले. या जयभिम महोत्सवातील भीमगीत गायन स्पर्धेला आंबेडकरी जनता मोठ्या संख्येने उपस्थित होती. या स्पर्धेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने मोलाचे परिश्रम घेतले.

# संविधान रक्षक रॅलीतर्फे मार्गातील सर्व महापुरुषांना पुष्पहार अर्पन करणार- ॲड. राजापुरकर

बीड । प्रतिनिधी

दि.१४ एप्रिल २०२४ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती बीड न्यायालय परिसरात साजरी करण्यात येणार आहे. सकाळी ७.३० वाजता प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करतील या कार्यक्रमास सर्व न्यायीक अधिकार्यांना निमंत्रित करण्यात आलेले आहे. मान्यवरांची भाषणे झाल्यानंतर सकाळी ९ वाजता संविधान रक्षक मोटारसायकल रॅली बीड न्यायालयापासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत आयोजित केली आहे अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड.प्रशांत राजापूरकर यांनी कळविली आहे. पुढे दिलेल्या पत्रकामध्ये म्हटले आहे की, सकाळी ९ वाजता संविधान रक्षक मोटार सायकल रॅली न्यायालयातून निघेल, रॅली दोन मोटार सायकलच्या रांगेमध्ये निघेल, सर्वात समोर वकील संघाचे पदाधिकारी असतील त्यानंतर सर्व महिला वकील असतील त्यानंतर सर्व पुरुष वकील असतील रॅलीमध्ये शिस्त पाळावी कोणीही कोणास ओव्हरटेक करु नये मोटार सायकलची स्पीड २० ते २५ असावी.

संविधान रक्षक मोटार सायकल रॅली सर्वात अगोदर छत्रपती शिवाजी महाराजांना प्रदक्षिणा घालून गोल परिघ करतील त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांना ॲड.रईस पठाण आणि ॲड.रोहिदास येवले हे पुष्पहार अर्पण करतील त्यानंतर रॅली मल्टीपर्पज ग्राउंडवर शिस्तीने जाईल त्या ठिकाणी महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास ॲड.कृष्णा पंडित आणि ॲड.मधुसूदन बाहेगव्हाणकर पुष्पहार अर्पण करतील. लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्यास ॲड.एकनाथ काकडे आणि ॲड.तेजस नेहरकर हे पुष्पहार अर्पण करतील. तसेच छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्यास ॲड.लहू जगताप आणि ॲड.अजित सोनटक्के हे पुष्पहार अर्पण करतील, त्यानंतर मावळा जिवा महाले यांच्या पुतळ्यास ॲड.दिपक तांगडे आणि ॲड.आनंद कुलकर्णी हे पुष्पहार अर्पण करतील. त्यानंतर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास ॲड.अविनाश गडगे आणि ॲड.इमरान शेख हे पुष्पहार अर्पण करतील. अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्यास ॲड.असीमा पटेल आणि ॲड.सायली सुतार ह्या पुष्पहार अर्पण करतील. सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास ॲड.संगीता वीर, ॲड.किर्ती कुलकर्णी, ॲड.अनिता चक्रे, ॲड.वंदना साळवे, ॲड.संगीता कोकाटे ह्या पुष्पहार अर्पण करतील. महात्मा ज्योतीबा फुले यांच्या पुतळ्यास ॲड.प्रशांत दगडखेर आणि ॲड.विठ्ठल शेळके हे पुष्पहार अर्पण करतील. त्यानंतर संविधान रॅलीमधील सर्व मोटारसायकल गिता कन्याशाळेजवळ जैन भवन समोरील परिसरात शिस्तीत पार्किंग करुन सर्व संविधान रक्षक पायी दोन-दोनच्या रांगेत जातील. संत गाडगेबाबा महाराज यांच्या पुतळ्यास ॲड.शिवाजी कांबळे आणि ॲड.प्रकाश गलांडे हे पुष्पहार अर्पण करतील. महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यास ॲड.सत्यनारायण ढाका आणि ॲड.सुभाष पिसोरे हे पुष्पहार अर्पण करतील. संत बसवेश्वर यांच्या पुतळ्यास ॲड.नितीन वाघमारे आणि ॲड.दिलीप वारे हे पुष्पहार अर्पण करतील. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास वकील संघाचे अध्यक्ष ॲड.प्रशांत राजापुरकर आणि ॲड.मंगेश पोकळे हे पुष्पहार अर्पण करतील. वरील संविधान रॅलीचे सुत्रसंचलन ॲड.राहुल साळवे हे करणार आहेत कार्यक्रम संपल्यानंतर ॲड.भिमराव चव्हाण यांची टिम डॉ.बाबासोब आंबेडकर पुतळा परिसर स्वच्छता करतील त्यांना सर्व संविधान रक्षक मदत करतील या कार्यक्रमास सर्व वकील संघाच्या सदस्याने पांढरी पँट, पांढरे शर्ट, काळा बुट चॉकलेटी टाय, निळा कोट परिधान करुन उपस्थित राहावे असे आवाहन ॲड.प्रशांत राजापुरकर यांनी केले आहे.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात डॉ. आंबेडकरांच्या समग्र ई-ग्रंथांचे वितरण



पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या समग्र ई- ग्रंथांचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ई मेलद्वारे वितरण करण्याचा नाविन्यपूर्ण उपक्रम दि. १० एप्रिल रोजी उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात त्यांच्या हस्ते सर्व विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना ई मेलद्वारे ई- ग्रंथ पाठवण्यात आले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, आयक्यूएसी समन्वयक डॉ. मनोजकुमार प्रकाश, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. दिलीप गिऱ्हे, डॉ. कुशाबा साळुंके, डॉ. न. पु. काळे, डॉ. काकासाहेब पोकळे उपस्थित होते.

आजच्या पिढीच्या विद्यार्थी व शिक्षकांना डॉ. आंबेडकरांचे विचार ज्ञात होऊन त्यांनी ते अंगिकारावेत या उद्देशाने या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. उपक्रम यशस्वी होण्यासाठी सांस्कृतिक विभागाचे डॉ. दिलीप गिऱ्हे, डॉ. कुशाबा साळुंके, डॉ. मनोजकुमार प्रकाश, प्रा. जयंत साठे, प्रा. प्रदीप मांजरे, प्रा. कावेरी खुरणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

cmyk

# रविवारी आनंदऋषीजी डायग्नोस्टिक सेंटर येथे ह्दयरोग व मधुमेह निदान शिबिराचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित, बीड येथील जालना रोड, शाहू बँकेजवळ असलेले आनंदऋषीजी डायग्नोस्टिक सेंटर येथे रविवार १४ एप्रिल २०२४ रोजी सकाळी १० ते ३ या वेळेत प्रसिध्द ह्दयरोग व मधुमेह तज्ञ डॉ.अनिकेत कटारीया हे ह्दय रोग व मधुमेह रुग्णांची तपासणी करणार आहेत.

सध्या उन्हाळ्याची चाहुल सुरु झाली असून ह्दय रोग व मधुमेह असणार्या रुग्णांना याचा त्रास होऊ शकतो. तसेच छातीत दुखणे, छाती जड वाटणे, घाम येणे, दम लागणे, चक्कर येणे यासाठी तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. बीड शहरातील व पंचक्रोषीतील रुग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या विश्वस्तांनी केले आहे.

या शिबीरात संपूर्ण बायपास सर्जरी, ह्दयातील झडप बदलणे, ह्दयातील छिद्र बुजवणे, लहान मुलांच्या हदय शस्त्रक्रिया व अँजियोप्लास्टी इत्यादीवर निदान करण्यात येणार आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत पात्र रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. शिबीरात ह्दयरोग तज्ञ व मधुमेह तज्ञ डॉ. अनिकेत कटारिया व तज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी व उपचार करणार आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटल रुग्णसेवेमध्ये राज्यामध्ये सुप्रसिध्द आहे.

आज पर्यंत १४ हजार ओपन बायपास सर्जरी, ४० हजारापेक्षा अधिक एन्जोप्लास्टी, १ लाख २५ हजारापेक्षा एन्जोग्राफी, विविध क्षेत्रामध्ये वैद्यकीय उपचारामध्ये आग्रगण्य आहे. डोळ्याचे १ लाख मोतिबींदू शस्त्रक्रिया अशा विविध आजारांवर रुग्णांची सेवा करण्याचा उच्चांक केलेला आहे. १ हजार ३०० पेक्षा जास्त कर्मचारी, विविध फिल्डमध्ये २५० पेक्षा अधिक डॉक्टर सेवा करत आहेत. ह्दयरोग व मधुमेह शिबीरात तपासणी करण्यासाठी नोंदणी फीस केवळ १०० रुपये ठेवण्यात आलेली आहे. वेळे अभावी नोंदणी करु न शकलेल्या रुग्णांची देखील तपासणी करण्यात येणार आहे.नोंदणीसाठी मो. ८२६२००९०९१ यावर संपर्क साधावा. रविवारी सकाळी १० ते ३ या वेळेत, अहमदनगर येथील तज्ञ डॉक्टर येवून रुग्णांची तपासणी करणार आहेत. संत आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने गेल्या २० वर्षापासून हॉस्पिटल कार्यरत आहे. तरी बीड शहरातील व पंचक्रोषीतील ह्दयरोग व मधुमेह रुग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन बीड शहरातील सर्व सकल जैन समाजाच्यावतीने करण्यात आले आहे. तसेच या सेंटरमध्ये जनरल ओपीडी, मेडिकल सुविधा, सिटीस्कॅन, एक्सरे, रक्त व लघवी तपासणी अल्प दरात केल्या जातात तरी रुग्णांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे.





## (उच्चत्तम) कृषि उत्पन्न बाजार समिती, माजलगांव जिल्हा बीड

### जाहीर प्रगटन

**भारत देशाला स्वर्ग बनवायचे असेल तर स्वच्छतेचा मूलमंत्र जपा**

शेतकऱ्यांना चांगला भाव, ग्राहकांना रास्त भाव व्यवहारासाठी सुविधांची उपलब्धता, शेतकऱ्यांचा शेतमाल उघड पध्दतीने लिलाव व प्रमाणीत इलेक्ट्रॉनिक वजनमापाने बाजार समितीच्या देखरेखी खाली वजन माप कटत्यांना प्रतिबंध, बाजार समितीचे कार्यक्षेत्रात मार्केट यार्ड शिवाय इतर ठिकाणी अधिसुचित शेतीमाल खरेदी विक्रीचा व्यवसाय करणेस व्यापाऱ्यांना प्रतिबंध, विक्री केलेल्या शेतीमालाच्या रक्कमेचे त्वरीत वितरण, शेतीमाल चांगला वाळवा, शेतीमाल साफ करुन आणा, बाजार भाव आवकीचा कल पहा, शेतीमाल खेडयात व खळयात विकू नका तर बाजार समितीच्या फुलेपिंपळगांव आवारात विका, कापूस खेरदो केंद्रावरच विक्री करा, आठवडी बाजारात, जुना मोंढा आवारात कापूस विक्री न करता जिनिंगवर कापूस खरेदीचे अधिकृत परवाना धारकांना विक्री करा, बाजार भाव/कृषि पणन/उत्पादन/उत्पादनोत्तर तंत्रज्ञान विषयक शासकीय योजना बाबतची माहिती व इतर शेती उपयोगी माहिती मार्गदर्शनाचे कृषि पणन मित्र या मासीकाचे (वार्षीक वर्गणी दर रु. २००/- वर्गणीदार होणेसाठी बाजार समितीशी संपर्क साधावा, बाजार भावा संबधी वेब साईड- www.msamb.com आणि www.agmarknet.nic.in, फुलेपिंपळगांव बाजार आवारात शेतीमाल विक्रीसाठी घेवून येणारे शेतकऱ्यांना रु. १/- मध्ये जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे फुलेपिंपळगांव मुख्य बाजार आवारात शेतीमाल विक्रीसाठी घेवून येणारे शेतकऱ्यांचा मुक्काम पडल्यास रु. १/- मध्ये निवासाची सोय करण्यात आली आहे, फुलेपिंपळगांव मुख्य बाजार आवारात बाजार समिती मार्फत ६० मे. टन क्षमतेचा ईलेक्ट्रॉनिक भुईकाटयाची सुविधा करण्यात आली आहे.

आपला परिसर स्वच्छ व सुंदर ठेवा ती आपली जबाबदारी आहे. स्वच्छता असे जिथे देवाचे वास्तव्य असे तिथे

**दैनिक राज्य लोकतंत्रच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा**



| एच.एन. सवने | मोरे श्रीहरी दिगांबर | नरवडे जयदत्त सुभाषराव |
|---|---|---|
| सचिव | उपसभापती | सभापती |

उच्चत्तम कृषि उत्पन्न बाजार समिती माजलगांव ता. माजलगांव जि. बीड. कार्यकारी मंडळ - १) श्री डक अशोक गोविंदराव, २) श्री सोळंके विरेंद्र प्रकाशराव, ३) श्री नाईकनवरे उध्दव विठ्ठलराव ४) श्री डाके दत्तात्रय जिजाबा ५) श्री जगताप मनोज बाळाभाऊ ६) श्री कचरे संजय वचिष्ठ ७) सौ. घायतिडक सरस्वती आसाराम ८) सौ. भोसले अंजली अबाजी ९) श्री सजगने नंदकिशोर दत्तात्रय १०) श्री जाधव अमोल अरुणराव ११) श्री नाईकनवरे नितीन किशनराव १२) श्री शेजुळ भागवत प्रकाशराव १३) श्री आगे भगवान लक्ष्मणराव १४) श्री होके प्रभाकर गणपतराव १५) श्री नावंदर जुगलकिशोर मिठुलाल १६) श्री पठाण कदीर पठाण शेरखाँ

टीप :- सदरची जाहीरात कोणीही परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द करु नये. जो कोणी सदरची जाहीरात प्रसिध्द करेल अशा वर्तमान पत्राचे जाहीरात बील देण्यात येणार नाही.

















This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# अजित पवारांच नवं संशोधन, सुप्रिया सुळेंवर टीका करताना म्हणाले, संसदेत भाषणं करून मतदारसंघाचे प्रश्न सुटत नाहीत

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती मतदारसंघाकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. पवार कुटुंबातील नणंद-भावजयी येथे एकमेकांसमोर उभ्या ठाकल्या आहेत. शरद पवार विरूद्ध अजित पवार असा एकप्रकारे हा सामना आहे. प्रचारसभांमुळे बारामतीमधील राजकीय वातावरण आता तापू लागले आहे. स्वत: शरद पवार आणि अजित पवार येथे प्रचारासाठी उतरले आहेत. बारामतीत बोलताना अजित पवार यांनी त्यांच्या स्टाईनमध्ये सुप्रिया सुळे यांच्यावर टीका केली आहे.



विशेष म्हणजे, संसदेत भाषणं करून मतदारसंघाचे प्रश्न सुटत नाहीत असं वक्तव्य करून अजित पवार यांनी सर्वांनाच धक्का दिला आहे. मात्र, पुढे बोलताना अजित पवार यांनी आपण किती चांगले वक्ते आहोत हे देखील सांगितले. मी भाषणात नंबर एक आहे, माझी पट्टी लागली तर मी सुद्धा चांगलं भाषण करतो, असेही अजित पवारांनी म्हटले आहे.अजित पवार यांनी म्हटले की, बारामतीमध्ये मतं मागण्याची काहीतरी लेव्हल होती. ही लेव्हल आता सोडायला लागले आहेत. आणि त्यातून लोकांना भावनिक केले जात आहे. त्यातून काही सांगितले जात आहे. नुसते संसदेत भाषणे करून माझ्या बारामती लोकसभा मतदारसंघाचे प्रश्न सुटत नाहीत. हा अजित पवारही भाषणात नंबर एकचा आहे. माझी पट्टी लागली तर मीही भाषणे करतो. पण मी भाषणंही करतो आणि कामंही करतो. मी विकासाला निधीही आणतो आणि एखादं काम वाजवून करून घेतो, असे अजित पवार म्हणाले.

# मानलेल्या बहिणीवर अत्याचार, संतप्त भावाने नराधमाला संपवले

**पिंपरी । प्रतिनिधी**

बहीणीवर सहकाऱ्याने लैंगिक संबंध प्रस्थापित केल्याच्या रागातून मानलेल्या भावाने वीट डोक्यात घालून तरुणाचा खून केल्याची घटना समोर आली आहे. ही घटना शुक्रवारी (दि. ५) भूमकर वस्ती, वाकड येथील भामा पर्ल सोसायटीत घडली. या घटनेचा हिंजवडी पोलीस अधिक तपास करत आहेत

निकेतकुणाल विजयकुमार सिंह (२८, रा. भुजबळवस्ती, वाकड), असे खून झालेल्याचे नाव आहे. लोकेंद्र किशोरसिंह (२८, रा. दत्त मंदिर रोड, वाकड, मूळ रा. राजस्थान) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी उपनिरीक्षक ज्ञानेश्वर अंकुशराव झोल यांनी बुधवारी (दि.




१०) हिंजवडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक कन्हैया थोरात यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीची मानलेली बहीण आणि मृत निकेतकुणाल सिंह हे एकाच कंपनीत नोकरीला होते. दरम्यान, ३ एप्रिल रोजी रात्री कंपनीतील सहकारी पार्टीसाठी एकत्र जमले होते. पार्टीनंतर पीडित तरुणी सहकारी निकेतकुणाल याच्या फ्लॅटवर थांबली. दरम्यान निकेतकुणाल याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या संपूर्ण घटनेची माहिती पीडित तरुणीने तिचा मानलेला भाऊ लोकेंद्र किशोरसिंह याला दिली. यानंतर संतापलेल्या अवस्थेत लोकेंद्र हा निकेतकुणाल याच्या फ्लॅटवर गेला. तेथे दोघांमध्ये वाद झाला. त्याचवेळी लोकेंद्रने सोबत आणलेली वीट निकेतकुणालच्या डोक्यात मारली. यामध्ये निकेतकुणाल जखमी झाला. त्यानंतर त्याला नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार केल्यानंतर त्याला घरी सोडण्यात आले. दरम्यान, रात्री झोपेत त्याचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. हिंजवडी पोलिस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.

# जुन्नरमध्ये घोड्यावर बसून अमोल कोल्हेंचा प्रचार;

## विरोधकांना म्हणाले मी घोड्यावर बसलो की काही जणांच्या पोटात लय दुखतंय



**पुणे । प्रतिनिधी**

शिरुर लोकसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमदेवार अमोल कोल्हे यांनी मतदारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटींवर भर दिला आहे. ते रहिवाशी सोसायट्या तसेच गावोगावी भेट देऊन प्रचार करत आहेत. आज कोल्हे यांनी जुन्नर तालुक्यातील निमगाव सावा, साकोरी त्यानंतर पारगाव तर्फे आळे या गावांना भेटी दिल्या. यावेळी कोल्हे यांनी घोड्यावरून प्रचार केला. २०१९ च्या निवडणुकीत घोड्यावरुन प्रचार केल्याने ते चर्चेत आले होते.

आज जुन्नर तालुक्यातील पारगाव तर्फे आळे येथे ग्रामस्थांनी अमोल कोल्हे यांचे फुलांची उधळण करत जंगी स्वागत केले. यानंतर गावातून अमोल कोल्हे यांची घोड्यावरून मिरवणूक निघाली होती. अमोल कोल्हे यांच्यासह शिवसेना नेते माऊली खंडागळे, भास्कर गाडगे देखील घोड्यावर स्वार झाले होते. यावेळी विरोधकांना टोला लगावताना अमोल कोल्हे म्हणाले, की मी जर घोड्यावर बसलो की काही जणांच्या पोटात लय दुखतंय.

२०१९ च्या निवडणुकीत सुद्धा अमोल कोल्हे यांनी घोड्यावरुन प्रचार केला होता.

आज पुन्हा जुन्नरच्या पारगाव तर्फे आळे गावात खासदार डॉ. अमोल कोल्हे यांना घोड्यावर बसवून ग्रामस्थांनी मिरवणूक काढली होती.

# कांदा लिलाव ११ दिवसांपासून बंद; नाशिकमध्ये एक लाख क्विंटलची खरेदी-विक्री ठप्प

**पुणे । प्रतिनिधी**

हमाल, मापाडी आणि व्यापाऱ्यांच्या वादावर तोडगा न निघाल्यामुळे नाशिक जिल्ह्यातील १५ बाजार समित्यांमध्ये मागील ११ दिवसांपासून कांदा लिलाव बंद आहेत. जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये दररोज सरासरी १० हजार क्विंटल कांद्याची खरेदी-विक्री होते. बंदमुळे सुमारे एक लाख क्विंटल कांद्याच्या खरेदी-विक्रीवर परिणाम झाला आहे.

नाशिक जिल्ह्यात मुख्य आणि उपबाजार आवार, अशा १५ बाजार समित्यांमध्ये २९ मार्चपासून कांद्याचे लिलाव बंद आहेत. त्यामुळे ऐन उन्हाळी कांद्यांच्या काढणीच्या हंगामात कांदा बाजारात शुकशुकाट आहे. मुळात कांद्याचे दर पडलेले आहेत. अशा काळात किमान नियमित खरेदी-विक्री सुरू राहणे अपेक्षित असताना लिलाव बंद आहेत. हमाल-मापाडय़ांच्या मागण्या व्यापाऱ्यांनी मान्य न केल्यामुळे सुरू असलेल्या संपात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.नाशिक ही देशातील मोठी कांदा बाजारपेठ आहे. या बंदचा सध्या देशातील बाजारावर फारसा परिणाम जाणवत नाही. मात्र, बंद आणखी लांबल्यास देशभरातील कांद्याच्या उपलब्धतेवर परिणाम होऊ शकतो, अशी कांदा व्यापारी आतिष बोराटे यांनी व्यक्त



केली.

नेमका वाद काय?

बाजार समित्यांमध्ये पारंपरिक पद्धतीने शेतकऱ्यांकडून हमाली, वराई, तोलाईच्या रकमेची कपात केली जात होती. सन २००८पासून ही वसुली शेतकऱ्यांकडून न करता खरेदीदारांकडून करावी, असा आदेश उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिला. राज्य सरकारनेही तसाच आदेश दिला आहे. या विरोधात नाशिकमधील व्यापाऱ्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर जिल्हा न्यायालयाने निर्णय घ्यावा, असे निर्देश उच्च न्यायालयाने दिले होते. प्रत्यक्षात आजही हमाली, तोलाई आणि वराईची रक्कम शेतकऱ्यांकडून वसूल केली जाते. पण, लेव्हीची रक्कम व्यापाऱ्यांकडून कपात होत नाही, तसेच ती माथाडी मंडळाकडेही जमा होत नाही. ही लेव्हीची रक्कम माथाडी मंडळाकडे जमा होत नाही, तोपर्यंत कांदा खरेदी-विक्रीत सहभागी होणार नाही, असे पवित्रा घेत आंदोलन सुरू करण्यात आले आहे. मात्र, व्यापाऱ्यांनी आम्ही लेव्ही देण्याचा प्रश्नच येत नाही, अशी भूमिका घेतली आहे. त्यामुळे अद्याप तोडगा निघालेला नाही.

नुकसान किती?

जिल्ह्यातील १५ बाजार समित्यांमध्ये रोज सरासरी सात ते १० हजार क्विंटल कांद्याची खरेदी-विक्री होते. अकरा दिवसांत एक लाख क्विंटल कांद्याची खरेदी-विक्री ठप्प झाली आहे. सरासरी दर प्रतिक्विंटल १२०० रुपये धरला, तरी ११ दिवसांत किमान १२०० कोटी रुपयांच्या उलाढालींचे नुकसान झाले आहे, अशी माहिती शेतकरी संघटनेचे नेते कुबेर जाधव आणि स्वतंत्र भारत पक्षाचे अनिल घनवट यांनी दिली.

प्रत्यक्षात तोलाई, हमाली न होता शेतकऱ्यांकडून प्रतिक्विंटल हमाली आणि तोलाईचे ४०० रुपये कापून घेतले जातात. त्यावर ३२ टक्के लेव्हीही घेतली जाते. प्लेट काटय़ावर वजन करण्याचा ४० रुपये खर्चही शेतकरीच करतो. शेतकऱ्यांना हा विनाकारण भुर्दंड पडत आहे. ही शेतकऱ्याची लूट थांबण्यासाठी सरकारने या प्रश्नावर तातडीने मार्ग काढण्याची गरज आहे. - अनिल घनवट, अध्यक्ष, स्वतंत्र भारत पक्ष

# पाण्याच्या टाकीत पडून दोन वर्षाच्या चिमुकल्याचा मृत्यू; ठेकेदारावर गुन्हा दाखल




**पुणे । प्रतिनिधी**

बांधकाम साईटवर बांधलेल्या पाण्याच्या टाकीत पडून दोन वर्षाच्या चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना लोणी काळभोर येथील रायवाडी रोडवरील गणेश खेडेकर यांच्या बांधकाम साईटवर ६ एप्रिल रोजी सकाळी पावणे बाराच्या सुमारास घडली. याप्रकरणी लोणी काळभोर पोलिसांनी ठेकेदारावर गुन्हा दाखल केला आहे.

प्रिन्स चंद्रकुमार कोशले (वय-२) असे मृत्यू झालेल्या मुलाचे नाव आहे. याप्रकरणी बापु शिवराम माने (वय-४४ रा. साठेवस्ती, लोणी काळभोर, ता. हवेली) याच्यावर भा.दंड.वि. कलम ३०४(अ) नुसार गुन्हा दाखल केला आहे. याबाबत पोलीस हवालदार विजय नथु जाधव यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रायवाडी रोडवर गणेश खेडेकर यांचे बांधकाम सुरु आहे. आरोपी बापु माने हा बांधकाम साईटवर ठेकेदार म्हणून काम करतो. माने याने घराच्या कन्स्ट्रशन साईटवर काम करताना दुर्लक्ष करुन निष्काळजीपणे जमिनीमध्ये पाण्याची टाकी बांधली. मात्र पाण्याच्या टाकीवर झाकण टाकले नाही. मृत प्रिन्स खेळत असताना झाकण नसलेल्या पाण्याच्या टाकीत पडला. टाकीत असलेल्या पाण्यात बुडून प्रिन्सचा दुर्दैवी मृत्यू झाला. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक तरटे करीत आहेत.

# मराठा संघर्ष योद्धा श्री.मनोज जरांगे-पाटील यांची कॉटन इंडिया हाऊस येथे सदिच्छा भेट

**आळंदी । प्रतिनिधी**

दि.८ एप्रिल २०२४ रोजी मराठा संघर्ष योद्धा मा.मनोज जरांगे-पाटील हे पुण्यातून आपला नियोजित कार्यक्रम करून आळंदी मार्गे पुढील कार्यक्रमांसाठी रवाणा होत आसताना शिवसंग्राम संपर्कप्रमुख पिंपरी-चिंचवड शहर पुणे.श्री.पांडुरंग आवारे-पाटील यांच्या देहू फाटा आळंदी येथील कॉटन इंडिया हाऊस ला सदिच्छा भेट दिली आसता मनोज जरांगे-पाटील यांचे स्वागत फटाके आदल्या वाजून केले व आदरणीय मनोज जरांगे-पाटील यांचा सत्कार शाल श्रीफळ देऊन पांडुरंग आवारे-पाटील, हनुमंत आवारे-पाटील, यांनी केला यावेळेस मनोज जरांगे-पाटील पाटील यांनी पांडुरंग आवारे-पाटील यांना त्यांच्या सर्व सहकार्याना पुढील उद्योग व्यवसाय,यशस्वीवाटचाली साठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या या प्रसंगी समवेत आमचे मार्गदर्शक मित्र व मनोज जरांगे-पाटील यांच्या अगदी जवळचे सहकारी मा.गंगाधर



नाना काळकुटे-पाटील,श्रीराम कुरुंदकर,आप्पासाहेब कुढेकर,महेश आण्णा दाभाडे, सचिन हावळे पाटील,अंकुश राक्षे,संजय दादा कटारे,समाधान कागदे,संजय गोडसे,भगवान डोफके,गोकुळ नवथर,

उदय भिसे पाटील, बद्रीनाथ तारक, जयदत्त धुटे,मनोज जरांगे-पाटील यांचे बॉडीग्राड रामप्रसाद कोलगुडे व अन्य सहकारी उपस्थित होते.आदरणीय मनोज दादा जरांगे-पाटील आपला प्रत्येकाला हेवा वाटावं असे आपण सर्व सामान्य घटकातील विस्थापित कुटुंबातील मराठा समाजातील लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी आजपर्यंत प्रामाणिक पणे काम करत आलात व पुढे ही करत आहात याचा आम्हास सार्थ अभिमान वाटत आहे खऱ्या आर्थाने आमचे दैवत लोकनेते स्व.विनायकरावजी मेटे साहेबांन चे स्वप्न आपल्या माध्यमातून पूर्णत्वाकडे जात आहे याचा देखील आम्हास आपला सार्थ अभिमान आहे.मराठा संघर्ष योद्धा श्री.मनोज दादा जरांगे पाटील यांनी कॉटन इंडिया हाऊस ला भेट दिल्या बद्दल पांडुरंग आवारे-पाटील यांनी त्यांचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले व मनोज दादा जरांगे-पाटील यांना पुढील यशस्वीवाटचालीस मनापासून शुभेच्छा देऊन आम्ही आपल्या सोबत सदैव आहोत म्हणून मनोज जरांगे-पाटील यांचा जय घोष करत घोषणा देण्यात आल्या यावेळेस शशिकांत राजे जाधव, आरूण कुरे पाटील,प्रतीक आहेर, वैभव नाईकवाडे, संकेत आनपठ,मंगेश लटके,शुभम गाढवे व अन्य मराठा बांधव उपस्थितीत होते.

# गांधर्व महाविद्यालय, सप्रेमतर्फे शनिवारी-रविवारी अण्णासाहेब बेहरे स्मृती युवा संवादिनी संमेलनाचे आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

भारतीय संगीत प्रसारक मंडळाचे गांधर्व महाविद्यालय व संवादिनी प्रेमी मंडळ (सप्रेम) यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ व दि. १४ एप्रिल रोजी अण्णासाहेब बेहरे स्मृती युवा संवादिनी संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून १२ गुरुंच्या १८ शिष्यांचा संमेलनात सहभाग असणार आहे. अशा पद्धतीने आयोजित करण्यात येत असलेले युवा कलावंतांचे संमेलन संवादिनीप्रेमी तसेच पुणेकर रसिकांसाठी पर्वणी ठरणार आहे.

संमेलन गांधर्व महाविद्यालयाच्या विष्णू विनायक स्वरमंदिरात तीन सत्रात आयोजित करण्यात आले असून संमेलनात १६ ते ३० या वयोगटातील कलावंतांचा सहभाग असणार आहे. संमेलनाचे उद्घाटन अण्णासाहेब बेहरे यांच्या स्नुषा अरुणा अशोक बेहरे यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य पंडित प्रमोद मराठे यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे.

अण्णासाहेब बेहरे यांना लहानपणापासूनच संवादिनी वादनाची आवड होती. शालेय, उच्चशिक्षण आणि व्यवसायामुळे ते कलेसाठी वेळ देऊ शकले नाहीत. त्यांच्या व्यवसायात मुलांचे पदार्पण झाल्यानंतर बेहरे



यांनी वयाच्या ६५व्या वर्षी गांधर्व महाविद्यालयात संवादिनी वादनाच्या शिक्षणास सुरुवात केली. अखेरच्या श्वासापर्यंत बेहरे संवादिनी शिक्षण घेत होते आणि वादनही करीत होते. पर्यावरणाच्या क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांचा पद्मश्री देऊन गौरविण्यात आले आहे.

संमेलनाचे पहिले सत्र शनिवार, दि. १३ रोजी सायंकाळी ५ ते ९ या वेळात होणार असून यात सुधन्वा कुलकर्णी, भावार्थ पिंजारकर, मल्हार चावरे, आकांक्षा केळकर, ऋतुराज धुपकर, आदिती गराडे यांचे वादन होणार आहे. दुसरे सत्र रविवार, दि. १४ रोजी सकाळी ९ ते १ या वेळात होणार असून यात प्रथमेश चोपडे, स्वानंद राजोपाध्ये, अंकिता कुंभार, ओजस रानडे, यश खडके, सारंग सांभारे यांचे वादन होईल. अखेरचे तिसरे सत्र (दि. १४) सायंकाळी ५ ते ९ या वेळात होत असून यात मालू गावकर, नचिकेत हरिदास, अथर्व कुलकर्णी, आकाश जलमी, वरद सोहनी, अमेय बिच्चु यांचे संवादिनी वादन होणार आहे. कलाकारांना केदार टिकेकर, श्रीधर गावकर, पराग पांडव, अमित जोशी, सोहम राजोपाध्ये, राज भद्र, आशय कुलकर्णी, अनुराग अलुरकर, चिन्मय लेले, प्रसाद महाजन तबला साथ करणार आहेत.संमेलन सर्वांसाठी खुले आहे.

# हाँगकाँगमधील रॅकेटचा पर्दाफाश: पुण्यातील ५ जणांना अटक

**पिंपरी । प्रतिनिधी**

हाँगकाँगमधून चालणाऱ्या फसवणुकीच्या रॅकेटचा पिंपरी-चिंचवड पोलिसांनी पर्दाफाश केला. सायबर सेलने सापळा रचून ५ जणांना बेड्या ठोकल्या. पिंपरी-चिंचवड परिसरातील नागरिकांची फसवणूक करून मिळालेले ४ कोटींहून अधिक रुपये क्रिप्टोकरन्सीद्वारे हाँगकाँगमधील आरोपीला पाठवल्याचे तपासात समोर आले आहे.




जुनेद मुख्तार कुरेशी (वय २१, रा. टिंगरे नगर, पुणे), सलमान मन्सूर शेख (वय २२, रा. इंदिरानगर, लोहगाव रोड, पुणे), अब्दुल अजीज अन्सारी (वय २३, रा. इंदिरा नगर, लोहगाव रोड, पुणे), आकिफ अन्वर आरिफ अन्वर खान (वय २९, रा. कोंढवा खुर्द, पुणे), तौफिक गफ्फार शेख (वय २२, रा. इंदिरानगर, लोहगाव रोड, पुणे) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सुसगाव येथील एका महिलेला इंस्टाग्रामवर शेअर मार्केट क्लासेस आणि शेअर मार्केट गुंतवणूक संदर्भात एक जाहिरात दिसली. महिलेला यामध्ये आवड असल्याने त्यांनी जाहीरातीच्या लिंकवर क्लिक केले. त्यानंतर महिलेला फिर्यादीला एका व्हाट्स अप ग्रुपला जॉईन करण्यात आले. इन्स्टिट्यूशनल डी मॅट अकाउंट काढण्यासाठी अनोळखी आरोपींनी एक फॉर्म पाठवला. त्यानंतर शेअर मार्केट मध्ये नव्याने येणाऱ्या कंपन्यांचे आयपीओ खरेदी करण्यासाठी फिर्यादीकडून आरोपींनी वेगवेगळ्या बँक खात्यावर ३१ लाख ६० हजार रुपये घेतले. फिर्यादी यांनी काही दिवसानंतर गुंतवलेली रक्कम परत मागितली असता ती रक्कम देण्यासाठी आरोपींनी चॅरिटी डोनेशन म्हणून आणखी चार लाख रुपये घेतले.

या गुन्ह्याचा तपास करताना बँक खात्यांचे सायबर सेलने तांत्रिक विश्लेषण केले. त्यानुसार, बँक खाते हाताळणारे आरोपी निष्पन्न करून पोलिसांनी पाच जणांना अटक केली. त्यांच्याकडून सात मोबाईल फोन, रोख रक्कम मोजण्याची मशीन, आठ डेबिट कार्ड, १२ चेकबुक, एक पासबुक आणि सात लाख रुपये रोख रक्कम जप्त केली.

# वरंध घाट ३० मे पर्यंत सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद

## जिल्हाधिकाऱ्यांनी जारी केली अधिसूचना

**पुणे । प्रतिनिधी**

रायगड जिल्हा हद्दीतील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९६५ वरील मौजे वरंध ते रायगड जिल्हा हद्दीत प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रस्त्याच्या दुपदरीकरणाचे काम, संरक्षण भिंत बांधण्याची व आवश्यक सुरक्षा उपाय योजना करण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे दि. ८ एप्रिल पासून ते ३० मे २०२४ पर्यंत वरंध घाटातील रस्ता सर्व प्रकारच्या अवजड व लहान मोठ्या वाहनांसाठी महामार्ग वाहतूकीसाठी बंद करण्याची अधिसूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केली आहे.

राष्ट्रीय महामार्ग ९६५ डीडी किमी ८८/१०० (राजेवाडी) ते किमी ९६/७०० (रायगड जिल्हा हद्द) या रस्त्याचे दुपदरीकरणाचे काम संरक्षण भिंती बांधण्याची व आवश्यक सुरक्षा उपाय योजना करण्यासाठीची कामे प्रगतीत आहे. वरंध गाव ते रायगड जिल्हा हद्दीमध्ये संरक्षक भिंतीचे काम प्रगतीत असून बहूतांश काम पूर्ण झालेले आहे,. परंतू साखळी क्रमांक ८८/१०० (मौजे वरंघ) ते ९६/७०० (रायगड जिल्हा हद्द) या लांबीमध्ये काम सुरु करावयाचे आहे. सदरच्या लांबीमध्ये खोल दरी व उंच डोंगर असून रस्त्याची रुंदी काम करावयास अपुरी आहे. सदरच्या लांबीमध्ये चालू वाहतूकीमध्ये काम करताना अपघात होण्याची दाट शक्यता आहे. तसेच पावसाळ्यापूर्वी रस्त्याचे काम पूर्ण करणे आवश्यक आहे. वाहतूक चालू ठेवल्यास ते शक्य होणार नाही सदर कालावधीकरीता वरंध गाव ते रायगड जिल्हा हद्दीमधील वाहतूक सर्व प्रकारच्या वाहतूकीकरीता बंद करणेबाबत कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग पेण आणि पोलीस अधीक्षक रायगड यांनी केलेल्या विनंतीनुसार जिल्हाधिकारी यांची खात्री झाली आहे.

वरंध घाटातील वाहतूक सर्व प्रकारच्या वाहतूकीकरीता बंद करणेबाबत तसेच सदरवेळी पर्यायी मार्ग वापराबाबत अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

नागरिकांनी पुण्याकडे जाण्यासाठी राजेवाडी फाटा-माणगांव-निजामपूर रोड-ताम्हाणी घाट-मुळशी पिरंगुट पुणे व पोलादपूर आंबेनळी घाट वाई मार्गे पुणे असा मार्ग वापरावा तसेच कोल्हापूरकडे जाण्यासाठी राजेवाडी फाटा-पोलादपूर-खेड-चिपळुण-पाटण-कराड- कोल्हापूर असा मार्ग वापरण्याची शिफारस करण्यात आली आहे.